cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२९ | गुरूवार, दि.१२ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बांगलादेशातील अराजक

बांगलादेशात हिंदूंवर वाढत चाललेले हल्ले, अत्याचार यामुळे अतिशय गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. हिंदू सरकारी कर्मचा–यांचे जबरदस्तीने राजीनामे घेतले जात आहेत. मंदिरांवर हल्ले होत आहेत आणि हंगामी पंतप्रधान मोहम्मद युनूस हे सारे मुकाट्याने पाहत आहेत. कट्टरपंथी शक्तींपुढे ते पूर्णत: हतबल झाले आहेत. इस्कॉन मंदिराशी संबंधित सर्व बँक खाती सील करण्यात आली आहेत. हे हल्ले जमात–उल–मुजाहिद्दीन ही बांगलादेशातील दहशतवादी संघटना घडवून आणत असल्याचा अहवाल इंटेलिजेन्सकडून देण्यात आला आहे. याबाबत भारत सरकारने गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

### संसदेच्या एका मिनिटाच्या कामकाजाला एवढा खर्च ?

नवी दिल्ली–अधिवेशन काळातील संसदेच्या कामाकाजासाठी एका मिनिटला २.५ लाख रुपये खर्च येतो, जो सरकारी तिजोरीतूनच केला जातो. त्यामुळे, संसदेतील वेळ आणि कामकाज किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येईल संसदेतील एका मिनिटाचा खर्च लक्षात घेता प्रत्येक तासाला झालेले नुकसान हे १.५ कोटी रुपये असून प्रत्येक दिवसाचे नुकसान झाल्यास ९ कोटी खर्च येतो. दरम्यान, हिवाळी अधिवेशन काळातील संसदेत आणखी ७ दिवसांचे कामकाज बाकी आहे. १२, १३ डिसेंबर आणि १६,१७,१८,१९,२० डिसेंबरपर्यंत कामकाज चालणार आहे.

# कापसावर बोंडअळी, वेचणीला मजूरही मिळेनात!

## हताश होत उभ्या पिकावर नांगर फिरवण्याची शेतकऱ्यांवर वेळ

बीड । प्रतिनिधी

**यंदा झालेला सरासरीपेक्षा अधिक पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या कापसावर बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढलाय. एकीकडे बोंडअळी दुसरीकडे वेचणीला मजूरही मिळत नसल्याने आता शेतकरी हताश झाले आहेत. त्यामुळे उभ्या कपाशीवर नांगर किंवा रोटावेटर फिरवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याचे राज्यात चित्र आहे.**

यंदा चांगला पाऊस झाल्याने पिकही जोमात येऊन उत्पन्न चांगले होण्याची शेतकऱ्यांना आशा होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांवर खर्चही जास्तच केला होता. यंदा राज्यात कापसाची लागवड जास्तच झाली असून भावही मिळत नसल्याचे चित्र आहे. किमान ८ हजार तरी भाव मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती मात्र आतापर्यंत कापसाला ७ हजाराच्या आतच भाव मिळाला आहे. त्यामुळे उत्पादन खर्चही निघत नसल्याचे चित्र आहे.



### नुकसान भरपाई नाहीच!

सरकारने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे केलेत मात्र अजूनही भरपाई मिळाली नसल्याच्या शेतकरी कल्पेश पाटील सांगतात. अखेर हताश होतं त्यांनी कापसाच्या उभ्या पिकावर रोटावेटर फिरवण्याचा निर्णय घेतला. कापूस हातातून गेला असला तरी रब्बी हंगामातील उत्पन्न घेता येईल या अपेक्षेत शेतकरी दिसून येत आहेत.

त्यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणून कापसावर बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. तर दुसरीकडे मजूर ऊसतोडणीला परराज्यात व परजिल्ह्यात गेल्याने वेचणीसाठी मजूरही मिळत नसल्याने शेतकरी हताश झाला आहे. एकीकडे बोंडअळी आणि दुसरीकडे मजुरांची कमतरता यामुळे कापसाच्या उभ्या पिकावर पान २ वर

### लाडकी बहीण योजनेच्या अटीत काय झाला बदल?

बहिणींना दिलासा: आदिती तटकरे यांनी दिले उत्तर

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महायुती सरकारची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सर्वात लोकप्रिय ठरली आहे. विधानसभा निवडणुकीत या योजनेमुळे महायुतीमधील तिन्ही पक्षांना भरभरुन यश मिळाले. त्यामुळे महायुतीने २३० आमदारांचा टप्पा गाठला. या योजनेत बदल झाल्याची माहिती सोशल मीडियावर येत आहे. त्यासंदर्भात तत्कालीन महायुती सरकारमध्ये महिला आणि बालकल्याण मंत्री असलेल्या आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण केले आहे. या योजनेत कोणताही बदल झालेला नाही? असे त्यांनी स्पष्ट केले आहे. पान २ वर



# महाराष्ट्रात लवकरच मोठा राजकीय भूकंप?

## मविआला २०१९ आणि २०२२ पेक्षा मोठा धक्का देण्याच्या भाजप तयारीत






मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रामध्ये २०१९ साली झालेला पहाटेचा शपथविधी तसेच २०२२ साली शिवसेनेमध्ये पडलेली उभी फूट या दोन्ही नाट्यमय घटना आजही राज्यातील प्रत्येकाच्या लक्षात आहेत. मात्र या दोन्ही घटनांपेक्षाही मोठा राजकीय भूकंप लवकरच राज्यात होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजप राज्यात काही तरी वेगळे करण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा असून खासदार की आमदार नेमके फोडले जाणार कोण? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.**

राज्यात सहा महिन्याच्या अंतराने पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निकालांमध्ये अगदी परस्पर विरोधी निकाल लागल्याचे पाहायला मिळाले आहे. लोकसभेला महाराष्ट्राच्या जनतेनं महाविकास आघाडीच्या पारड्यात मत दिले. तर दिवाळीनंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या पान २ वर

### बावन्नकुळे यांच्याकडून कबुली

महाराष्ट्रामध्ये लवकरच भाजपाकडून ऑपरेशन लोटस राबवले जाण्याची दाट शक्यता आहे. यासंदर्भातील काही धक्कादायक खुलासे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे यांनी केले आहेत. महाविकास आघाडीचे काही खासदार भारतीय जनता पार्टीच्या संपर्कात असल्याचे ते म्हणाले. लवकरच हे खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### कोणाचे किती खासदार?

महाराष्ट्रामध्ये एकूण ४८ खासदार आहेत. २०२४ साली एप्रिल–मे महिन्यांमध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी ३० जागांवर विजय मिळवला. यापैकी काँग्रेसने सर्वाधिक १३, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे ९ तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८ खासदार निवडून आले. दुसरीकडे भाजपाला ९, शिंदेंच्या शिवसेनेने ७ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ एका जागी विजय मिळवता आला. एक अपक्ष उमेदवार जिंकून आला.

### थेट प्रवेश होणार की राजीनामा देऊन होणार?

हे खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार म्हणजेच त्यांना त्यांच्या विद्यमान खासदारकीचा राजीनामा द्यावा लागेल. त्यामुळेच अवघ्या सहा महिन्यांपूर्वी निवडून आलेले कोणते खासदार भाजपामध्ये जाण्यासाठी आपल्या खासदारकीचा राजीनामा देणार हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. असे झाले तर हा २०१९ च्या राजकीय नाट्यापेक्षा मोठी घडामोड असेल असे मानलं जात आहे.


### अजित पवारांना युगेंद्र पवारांनी सुनावले

पुणे । प्रतिनिधी

आम्ही एकेकाळी एकत्र होतो असे काही सहकारी आता महायुतीत आहेत. त्यामुळे त्यांनी महायुतीच्या वरिष्ठांना सांगितले पाहिजे, असे बोललेले त्यांना आवडणार नाही. हे त्यांनी सांगितले पाहिजे, असे युगेंद्र पवार म्हणाले. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर अतिशय खालच्या शब्दांत टीका करण्यात आली. त्यांच्या टीकेबाबत आज शरद पवार गटाचे नेते युगेंद्र पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी आपले काका तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सुनावले.

# मुहुर्त ठरला; १४ डिसेंबरला मंत्रीमंडळ विस्तार?

## फडणवीस–अजित पवार दिल्ली दौऱ्यावर; आज महायुतीच्या नेत्यांची बैठक




मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाला असला तरी मंत्रीमंडळ विस्ताराबाबत कोणताच निर्णय समोर येत नव्हता. मात्र मंत्रीमंडळ विस्ताराचा मुहुर्त ठरला असून १४ डिसेंबर रोजी मुंबईत मंत्र्यांना शपथ दिली जाणार असल्याचे बोलले जात आहे. तत्पुर्वी खातेवाटप निश्चित व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पान २ वर

### शिंदेसेनेच्या तीन मंत्र्यांना मिळणार डच्चू

शिंदे सरकारमधील महायुतीच्या काही मंत्र्यांना वगळले जाणार असल्याचे म्हटले जात असून शिंदेसेनेच्या सहा मंत्र्यांच्या नावांची जोरदार चर्चा आहे. या मंत्र्यावर पक्षातील आमदार नाराज असून हे मंत्री वेळ देत नाहीत, कामे करीत नाहीत, असा आमदारांचा आरोप आहे. यात तानाजी सावंत, दादा भुसे, दिपक केसरकर, गुलाबराव पाटील, संजय राठोड, अब्दुल सत्तार यांचा समावेश असून यातील संजय राठोड, अब्दुल सत्तार आणि गुलाबराव पाटील यांना एकनाथ शिंदे हे डच्चू देणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. **तानाजी सावंत** यांचे पक्षातील महत्व आणि मराठा समाजात असलेली क्रेझ पाहता त्यांना पुन्हा संधी दिली जाण्याची शक्यता आहे. तर दादा भुसे आणि दिपक केसरकर यांना सुध्दा मंत्री केले जाण्याची शक्यता आहे. अब्दुल सत्तार यांच्यावर तर संभाजीनगर जिल्ह्यातील भाजप नेते सुध्दा नाराज असून त्यांच्या जागी आ. संजय सिरसट यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

### एकनाथ शिंदेंना नगरविकास खाते?

एकनाथ शिंदे हे अगोदर मुख्यमंत्रीपदामुळे तर त्यानंतर खात्यांवरुन नाराज असल्याचे बोलले जात असून ते फडणवीस आणि अजित पवार यांच्यासोबत दिल्लीला सुध्दा गेले नाहीत. तर त्यांना नगरविकास खाते दिले जाणार असल्याचे समजते. तर भाजप गृह आणि महसुल खाते सोडण्यास तयार नसल्याचे दिसते.

# पवार साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे जाणते राजे पद्मविभूषण खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या ८४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने बीडमध्ये जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिकांनी गुरूवारी (दि.१२) रोजी राष्ट्रवादी भवन येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**



पद्मविभूषण खा.शरदचंद्र पवार साहेब यांचा ८४ वा वाढदिवस गुरूवारी (दि.१२) रोजी आहे. पवार साहेबांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बीडमध्ये राष्ट्रवादी भवन येथे सकाळी ११:०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ८४ उत्कृष्ट विद्यार्थी, ८४ जेष्ठ नागरिक, पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.११ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,७२० | २,७२० | २,७२० |
| ज्वारी/हायब्रिड : ६३.०० क्विंटल | १,९५० | २,५५१ | २,१५४ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ९.०० क्विंटल | ६,००० | ७,८६१ | ६,९३० |
| बाजरी: १२.५० क्विंटल | २,२६० | ३,००१ | २,६८० |
| मुग : २६.०० क्विंटल | ६,९३१ | ७,२६० | ७,१३५ |
| सोयाबीन: ६९.५० क्विंटल | ३,३०० | ४,०८१ | ३,९३८ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# कोविडपेक्षा घातक व्हायरसचे ३२३ सॅम्पल लॅबमधून गायब

## धोकादायक: जगभरात तज्ज्ञांची झोप उडाली, नागरीकांमध्ये चिंता



नवी दिल्ली । प्रतिनिधी

**जगभरात कोरोना व्हायरसने दोन वर्ष हाहाकार माजवला होता. आता त्यापेक्षाही घातक असणाऱ्या व्हायरसचे ३२३ सॅम्पल लॅबमधून गायब झाले असून त्यामुळे एकच खळबळ माजली आहे. जगभरातील आरोग्य तज्ञांची त्यामुळे झोप उडाली आहे.**

कोरोना व्हायरसने २०२० आणि २०२१ या वर्षात जगभर हाहाकार माजवला. या महामारीमुळे लाखो लोकांना आपला पान २ वर

### व्हायरोलॉजी लॅबमधून प्राणघातक विषाणू गायब

क्वीन्सलँडच्या पब्लिक हेल्थ व्हायरोलॉजी लॅबमधून प्राणघातक विषाणूच्या कुपी बेपत्ता झाल्याचा समज आहे जेव्हा ते फ्रीजरमध्ये ठेवलेले होते तेव्हा ते खराब झाले होते. पत्रकार परिषदेत बोलताना क्वीन्सलँडचे मुख्य आरोग्य अधिकारी जॉन गेरार्ड म्हणाले, या नमुन्यांचे हे हस्तांतरण चिंतेचे कारण आहे. योग्य कागदपत्रांची पूर्तता न करता ते फ्रीजरमध्ये नेण्यात आले. नमुना त्या सुरक्षित स्टोरेजमधून काढला गेला असेल आणि तो हरवला असेल किंवा अन्यथा बेहिशेबी असेल, तर याचा धोका सर्वाधिक असल्याचे म्हटले जात आहे.

### मानवांसाठी व्हायरस प्राणघातक

लॅबमधून बाहेर पडलेल्या विषाणूचे तीनही प्रकार हेन्ड्रा व्हायरस, हंता व्हायरस आणि लस्सा व्हायरस मानवांसाठी घातक ठरू शकतात. हेंड्रा विषाणू प्रामुख्याने घोड्यांना संक्रमित करतो, परंतु तो मानवांमध्ये देखील पसरू शकतो. या विषाणूमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण ५७ टक्के आहे. १९९४ मध्ये ब्रिस्बेन उपनगरात २१ घोडे आणि दोन मानवांना संसर्ग झाल्यानंतर हा विषाणू पहिल्यांदा सापडला होता. डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार, विषाणूचा नैसर्गिक होस्ट फ्रूट बॅट आहे, ज्यापासून हा संसर्ग घोड्यांमध्ये आणि नंतर मानवांमध्ये पसरतो. हा व्हायरस प्राणघातक आहे.




cmyk

## अग्रलेख

# अविचारी लढाई किती काळ चालणार?

बांगलादेशातील अराजक

बांगलादेशात हिंदूंवर वाढत चाललेले हल्ले, अत्याचार यामुळे अतिशय गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. हिंदू सरकारी कर्मचा-यांचे जबरदस्तीने राजीनामे घेतले जात आहेत. मंदिरांवर हल्ले होत आहेत आणि हंगामी पंतप्रधान मोहम्मद युनूस हे सारे मुकाट्याने पाहत आहेत. कट्टरपंथी शक्तींपुढे ते पूर्णत: हतबल झाले आहेत. इस्कॉन मंदिराशी संबंधित सर्व बँक खाती सील करण्यात आली आहेत. हे हल्ले जमात-उल-मुजाहिद्दीन ही बांगलादेशातील दहशतवादी संघटना घडवून आणत असल्याचा अहवाल इंटेलिजेन्सकडून देण्यात आला आहे. याबाबत भारत सरकारने गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

१९७१ मध्ये भारताच्या मदतीमुळे बांगलादेशची निर्मिती झाली. त्या वेळी तेथील हिंदूंची लोकसंख्या २२ टक्के होती मात्र आता ५ दशकांनंतर तेथे फक्त ८ टक्के हिंदू आहेत. गत ऑगस्टमध्ये इस्लामी कट्टरवाद्यांनी कट-कारस्थान करून शेख हसीना सरकार उलथवून टाकले. इस्लामी मूलतत्त्ववादी गटाने हिंदू समाजाला तसेच हिंदू मठ, मंदिरे, प्रतिष्ठानास लक्ष्य करून हिंसा व रक्तपात सुरू केला. ज्या इस्कॉन मंदिर व्यवस्थापनाने बांगलादेशात मानवी मूल्य जपून त्यांची सेवा केली त्याच इस्कॉन मंदिराला लक्ष्य करण्यात आले. इस्कॉनचे स्वामी चिन्मयानंद यांना विनाकारण अटक करण्यात आली. त्यांच्यावर सूडबुद्धीने खटला चालवण्यात आला.

एकूणच तेथे अराजकतेने टोक गाठले आहे. एवढे सारे होत असताना एरव्ही मानवाधिकाराच्या नावाने गळे काढणा-या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्था मात्र मूग गिळून गप्प बसल्या आहेत त्यामुळे आता भारतानेच कडक पावले उचलायला हवीत. बांगलादेशमध्ये अल्पसंख्य हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांविरोधात पश्चिम बंगालमध्ये विविध ठिकाणी हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलने केली आहेत. दोन-तीन महिन्यांपासून बांगलादेश आणि भारत यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. हा तणाव दूर करण्यासाठी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री बांगलादेशच्या दौ-यावर आहेत. शेख हसिना सरकारच्या पतनानंतर आणि नवे हंगामी सरकार आल्यानंतर भारताच्या उच्च स्तरावरील अधिका-याचा हा पहिलाच दौरा आहे. मिस्त्री यांच्या भेटीमुळे दोन्ही देशातील तणाव निवळण्यास मदत होईल, असे बांगलादेशच्या परराष्ट्र खात्याचे सल्लागार महंमद तौहिद हुसेन यांनी म्हटले आहे. कोणतीही अडचण दूर करण्यासाठी परस्पर संवाद प्रस्थापित करणे खूप महत्त्वाचे आहे, असे हुसेन म्हणाले.

५ ऑगस्टनंतर बांगलादेश आणि भारत यांच्यातील संबंध बिघडले आहेत. त्यासाठी दोन्ही बाजूंनी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि बदललेले वास्तव स्वीकारले पाहिजे, असेही हुसेन यांनी म्हटले आहे. खरे पाहता बांगला देशात विद्यार्थ्यांनी उठाव केल्यानंतर शेख हसीना सरकार कोसळले. शेख हसीना यांना देश सोडावा लागला. शेख हसीना यांनी भारतात आश्रय मागितला आणि त्याला भारताने सकारात्मक प्रतिसाद दिला यात भारताची चूक ती काय? या घटनेमुळेच भारताबद्दल बांगलादेशमध्ये कडवटपणा निर्माण झाला. बांगलादेशने भारताची भूमिका समजून घेतली नाही. या कडवटपणाचा द्विपक्षीय व्यापारावरही परिणाम झाला आहे. व्यापारातील घसरणीचा परिणाम दोन्ही बाजूंवर झाला आहे.

अनेक बांगलादेशींनी भारतात घुसखोरी केली आहे. त्याचा आर्थिक ताण भारताला सहन करावा लागत आहे. भारताचे काही हितशत्रू बांगलादेश भारताविरोधात कसा जाईल, याचीच वाट पाहत आहेत. बांगलादेशातील सद्यपरिस्थिती अतिशय वेदनादायी आहे. पदच्युत पंतप्रधान शेख हसीना भारताच्या आश्रयाला आल्यानंतर बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर विशेषत: हिंदूंवर सातत्याने हल्ले होत आहेत. त्या विरोधात आवाज उठवणा-यांवर करडी नजर ठेवली जात आहे. बांगलादेशातील अत्याचाराविरुद्ध भारतातही उग्र आंदोलने झाली. या अशांततेची बिजे बांगला देशातील अल्पसंख्याकांवरील अत्याचारांमध्ये आहेत. बांगलादेशच्या संवैधानिक आश्वासनानंतरही तेथे असलेले हिंदू सातत्याने हिंसा, अत्याचार आणि छळाचे बळी ठरत आहेत. तेथील हिंदूंची घरे आणि प्रार्थनास्थळांवर जमावांकडून होणारे हल्लेही चिंतेची बाब आहे. बांगलादेशातील अल्पसंख्याक कमालीचे असुरक्षित झाले आहेत. अल्पसंख्याक संघटनांद्वारे सुरक्षेची याचना केल्यानंतर त्यांची जबाबदारी अर्थातच कार्यवाहू सरकारवर आहे.

अन्यायग्रस्तांना न्याय देण्यासाठी विशेष न्यायालयांच्या माध्यमातून कारवाई करण्याचे काम सरकारने कठोरपणे पार पाडायला हवे. जर सरकारने वेळीच पावले उचलली नाहीत तर तेथील अशांततेत तेल ओतल्यासारखेच होईल. सध्या बांगलादेशात ज्या घटना घडत आहेत त्या पाहता तेथील लोकशाही विकलांग झाली आहे असेच म्हणावे लागेल. तेथील सर्वच अल्पसंख्याकांमध्ये शांती आणि सुरक्षेचे वातावरण निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे अन्यथा त्याचे पडसाद आजूबाजूच्या देशांमध्ये पसरायला वेळ लागणार नाही. विद्यार्थी आंदोलनाच्या माध्यमातून झालेल्या राजकीय परिवर्तनानंतर वाढत चाललेल्या कट्टरतेवर युनूस सरकारला अंकुश ठेवावा लागेल. बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होणा-या अत्याचाराविरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीदरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी बांगलादेशातील हिंसेसंदर्भात तीव्र चिंता व्यक्त केली होती.

शेख हसीना सरकारच्या पतनानंतर बांगलादेशात दोन आठवड्यांत अल्पसंख्याकांवर सुमारे दोन हजार हल्ले झाले म्हणे. या हल्ल्यातील गुन्हेगारांची ओळख पटल्यानंतरही त्यांच्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. भारताने केलेल्या त्याग आणि बलिदानातून बांगलादेशची निर्मिती झाली आहे याची जाण बांगलादेशींनी ठेवायला हवी. बांगलादेशात जेव्हा जेव्हा सत्ता लष्कराच्या हातात गेली तेव्हा तेव्हा तेथील कट्टरपंथीयांना संरक्षणच मिळाले आहे हा इतिहास आहे. युनूस सरकार अल्पसंख्याकांना संरक्षण देण्यात कुचकामी ठरले आहे. बांगलादेशातील घडामोडीवर चीनची नजर आहे. भारताला आता राजनैतिक आणि कुटनीतीद्वारे युनूस सरकारवर दबाव आणावा लागेल.

# महाराष्ट्रात मोठा गैरव्यवहार; तरुणांच्या खात्यातून ११४ कोटी गायब

## २१ राज्यातून अन् १० बँकांमधून मालेगावातील बँकेत जमा केले पैसे

**नाशिक । प्रतिनिधि**

**महाराष्ट्रात मोठा गैरव्यहार फघडकीस आला आहे. मालेगाव येथील मर्चंट बँकेच्या मालेगाव शाखेत ११४ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. बेरोजगार तरुणांच्या खात्यावरून ११४ कोटींची उलाढाल करण्यात आली आहे. देशातील २१ राज्यांमधून मालेगावच्या बँकेत पैसे वर्ग करण्यात आले आहेत. कोल्हापूर बँकेच्या वेगवेगळ्या खात्यातून १ कोटी ९० लाख वर्ग करण्यात आलेत.**

नाशिक मर्चंट बँकेच्या मालेगाव शाखेत बेरोजगार तरुणांच्या खात्यावरून ११४ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकील आला आहे. या व्यवहारात एकूण २१ राज्य सहभागी आहेत. २१ राज्यांमधील १० बँकांमधून मालेगावच्या या बँकेमध्ये दहा कोटी वर्ग करण्यात आले होते. कोल्हापूर येथील बँकेच्या वेगवेगळ्या खात्यातून एक कोटी ९० लाख नागपूर मुंबई पुणे येथील शाखांमधून वीस लाख असे करत कोट्यावधी रुपयांचा व्यवहार झाल्याचा समोर आला आहे.

सिराज मोहम्मद आणि त्याच्या गँगने मालेगावात हिंदू तरुणांना फसवून त्यांचे नाव बोगस कंपन्या स्थापन करून त्यांच्या नावावर १०० कोटी रुपये मागविण्यात आले. या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी आहे. फसवणूक करून काढण्यात आलेली ११४ कोटी रुपयांची रक्कम मालेगाव मधुन. व्होट जिहादचा प्रचार व प्रसार करणाऱ्या नेते, संस्था संघटना यांना वितरित करण्यात आल्याचा गंभीर आरोप सोमय्या यांनी केली. सोमय्या यांनी आज पुन्हा मालेगावात बँक १०० कोटी फसवणूक झालेल्या प्रकरणातील तरुण व तक्रारदार यांची भेट घेतली. तत्पूर्वी सोमय्या यांनी मालेगाव अपर पोलीस अधीक्षक यांची भेट घेवून या घोटाळ्यातील तपासाबाबत बंद दाराआड चर्चा केली. तर नाशिक मर्चंट बँक व महाराष्ट्र बँकेला भेट देवून माहिती घेतली होती.

# मंगेश चिवटेंना हटवले, नाईक नवे विभागप्रमुख

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाला मिळाला नवा शिलेदार





**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी विभाग प्रमुख मंगेश चिवटे यांना हटवण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. रामेश्वर नाईक यांची नवे विभाग प्रमुख म्हणून निवड केली आहे. एकनाथ शिंदे यांना हा मोठा धक्का मानला जात आहे. नाईक हे गिरीष महाजन यांचे विश्वासू मानले जातात.**

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी विभाग प्रमुख पदी मंगेश चिवटे यांची निवड केली होती. चिवटे यांनी या विभागात चांगले काम देखील केले होते. तसेच त्यांनी मराठा आंदोलनात मध्यस्थी केल्याने त्यांचे नाव चांगलेच चर्चेत आले होते. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यावर सहा दिवसानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुख पदावरुन मंगेश चिवटे यांना हटवले असून त्यांच्या जागी रामेश्वर नाईक यांची वर्णी लावण्यात आली आहे.

### डॉ. ओमप्रकाश शेटेंच्या कार्याचे अजूनही स्मरण



२०१४ साली देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची निवड केली होती. निवडीनंतर पाच वर्ष शेटे यांनी मागे वळून पाहिले नाही, तर राज्यातील वाड्या, वस्त्यापर्यंत या विभागाकडून गरजू रुग्णांना लाभ मिळवून देत त्यांच्यावर उपचार केले. असंख्य रुग्णांना त्यांच्यामुळे जीवदान मिळाले. त्यामुळे राज्यात त्यांना देवदुत म्हणून ओळखले जाते. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यावर ओमप्रकाश शेटे हेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी येतील असे सर्वांना वाटत होते. मात्र नाईक यांची निवड करण्यात आल्याने श्री. शेटे यांच्या या विभागातील कार्याचे स्मरण अजूनही संपुर्ण राज्याला आहे. सध्या ते भारत सरकारच्या आयुष्यमान भारत मिशनच्या महाराष्ट्र प्रमुखपदी कार्यरत आहेत.

### कोण आहेत डॉ. रामेश्वर नाईक

रामेश्वर नाईक हे गिरीष महाजन यांचे विश्वासु मानले जातात. त्यांनी संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून कला शाखेतून पदवी घेतली आहे. २०१४ साली त्यांनी वैद्यकीय शिक्षण आणि जलसंपदा विभागात सल्लागार म्हणून काम पाहिले असून त्यांनंतरच्या काळात त्यांनी धर्मादाय संस्थांमध्ये सल्लागार आणि विश्वस्त म्हणून काम पाहिले आहे. २०२१ मध्ये त्यांची वैद्यकीय समितीच्या सल्लागारपदी नियुक्ती केली होती. महायुतीच्या कार्यकाळात उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी काम केले होते.

# देशमुख खून प्रकरणी सर्व आरोपी तात्काळ अटक करा-सातपुते

**बीड । प्रतिनिधी**



मस्साजोग ता.केज.येथील सरपंच संतोष देशमुख यांचा अपहरण करून दिवसा ढवळ्या निर्दयी खून केला. ही घटना अत्यंत क्लेशदायक असून आशा घटनेने सर्व सामान्य जनतेमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण होऊ पाहत आहे. लोकशाही आणि कायद्याच्या राज्यामध्ये अशाप्रकारे दिवसा ढवळ्या खून होत असतील तर या राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था आहे का नाही हा सर्व सामान्यांना प्रश्न पडतो. बीड मध्ये आशा प्रकारच्या घटना घडत असून बीडचा बिहार होतोय का असा प्रश्न निर्माण होत आहे. अपहरण झाल्याबरोबर स्थानिक पोलीस स्टेशनला तात्काळ माहिती देऊन सुध्दा पोलिस कारवाई करु शकले नाही.अपहरण केल्याबरोबर पोलिस घटनास्थळी पोहचले आसते तर कदाचित संतोष देशमुख यांचा जीव वाचला असता परंतु या घटनेमागे कोणाचा तरी हात आहे का,या घटनेतील मारेकऱ्यांना कोणाचेतरी पाठबळ असल्याशिवाय या गुंडाची एवढी हिम्मत होऊ शकत नाही या राज्याचे सत्ताधारी यांचे या गुंडांना अभय आहे का हा प्रश्न निर्माण होत आहे. घटना होऊन ४८ घंटे झाले तरी पोलिस आरोपींना अटक करू शकले नाही हे सुद्धा शंकास्पद आहे. या घटनेतील मारेकऱ्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. यांच्यावर एस.आय.टी.नेमून घटनेची कसून चौकशी केली पाहिजे.. या मारेकऱ्यांच्या पाठीशी कोण आहे त्याचेही फोन डिटेल्स चेक करून त्याला सह आरोपी केले पाहिजे. ज्या पोलिस अधिकाऱ्यांनी या घटनेकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केले आशाही पोलिस अधीकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली पाहिजे. बीड जिल्हा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आम्ही संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांची भेट घेऊन आरोपींना तात्काळ अटक करुन कसून चौकशी करण्याची मागणी करत आहोत.. त्याचप्रमाणे वरिष्ठांच्या कानावर टाकून बीड जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था बाबत प्रश्न उपस्थित करून या घटनेची एस.आयटी.स्थापन करून चौकशीची मागणी केली जाईल..!!

### तालुकास्तरीय विज्ञान-गणित प्रदर्शनात श्री गणेश विद्या मंदीर शाळेचे यश

अंमळनेर। प्रतिनिधी

पिंपळवंडी येथील स्वामी अमृतभारती विद्यालय व गटशिक्षणाधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान,गणित व पर्यावरण प्रदर्शनात अंमळनेर (भांड्याचे) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्यामंदिर शाळेच्या 'वाटर रिसायकल' या उपकरणाला लहान गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. कु.अन्विता जालिंदर मिसाळ हीने बनविलेल्या



'वाटर रिसायकल' या वैशिष्ट्यपूर्ण उपकरणाला पाटोदा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात लहान गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. सदर विद्यार्थिनींना शाळेतील जेष्ठ विज्ञान शिक्षक व विभागप्रमुख पी एस उडाणे ,विज्ञान विषयशिक्षक आर डी खलाटे, सदावर्ते , गाडीलोहार, पठाण, डुचे , प्रयोगशाळा सहाय्यक भांगे वर्गशिक्षिका श्रीमती मेढे तसेच इतर सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.शाळेच्या या यशाबद्दल शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके, जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर यांनी कु.अन्विता मिसाळ हीचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीबाबत खा.सोनवणेंनी घेतली केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट

## अपहरण प्रकरणी सीबीआयमार्फत चौकशी करण्याची केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात खून, मारामाऱ्या आणि अपहरणाच्या गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. असे असताना पोलीस निपक्षपातीपणे कारवाई करायचे सोडून अशासकिय लोकांच्या दबावात काम करत आहेत. यामुळे जिल्ह्यात गुन्हेगारीने कळस गाठला असून जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी व्हावी, अपहरणांच्या प्रकरणांची सीबीआय मार्फत चौकशी करावी, या मागणीसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी अमित शहा यांनी ठोस कारवाईचे आश्वासन दिले.

आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा साहेब यांची भेट घेतली. जिल्ह्यात बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत शहा यांना निवेदन दिले. बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत खराब झालेली आहे. कोणत्याही प्रकरणात अशासकिय लोकांचा हस्तक्षेप होत असल्याने पोलीस यंत्रणा हातचे बाहूले बनून काम करत आहे. अर्थातच पोलीस निपक्षपातीपणे काम करत नाहीत. परिणामी, जिल्ह्यात वाळूमाफिया, भुमाफिया, गुटखा माफिया, खंडणी, खून, अवैध शस्त्रांचा व्यापार फोफावत आहे. परळीत अमोल डुबे यांचे अपहरण करून त्यांच्याकडून खंडणी वसूल करण्यात आली. यानंतर त्यांना अंधाऱ्या रात्री घाटात सोडून दिले. मस्साजोग येथील सरपंच पती संतोष देशमुख यांनी पवनचक्की प्रकरणात खंडणीला विरोध केला म्हणून



अपहरण करून हत्या केली. संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे कळताच मी जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांना सलग फोन केले. मॅसेजेस केले परंतु संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांचा मृत्यू झाला. पोलीस अधिक्षक यांचा संपर्क होऊ शकला असता तर कदाचित त्यांचा जीव वाचला असता. यामुळे पोलीस अधिक्षकांच्या भुमिकेबाबत संशय निर्माण होत आहे. बीड जिल्हा पोलीसांकडून खोट्या केसेस करणे आणि खऱ्या अपराधाकडे दुर्लक्ष करणे सर्रासचे झाले आहे. यामुळे कायद्याची अमलबजावणी होणे अशक्य झाले आहे. पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती गोवर्धन सानप हे दोन दिवस बेपत्ता होते. त्यांचा ग्रामस्थांनी शोध घेतला परंतु दोन दिवसांनी त्यांचे प्रेत शेतात आढळून आले. हा मृत्यू कशामुळे झाला, याचेही ठोस कारण पोलीसांनी दिलेले नाही. याबाबतही संशय आहे. अशा अपहरणांच्या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, याच बरोबर जिल्हा पोलीस दलाबाबत सामान्य माणसांच्या मनात अविश्वास निर्माण झालेला आहे. यामुळे केंद्रीय सुरक्षा यंत्रणेकडून विशेष पथक बीड जिल्ह्यात पाठवून याठिकाणी कारवाया कराव्यात, जेणेकरून पोलीसांकडून आयपीसी कलमांचा दुरूपयोग होणार नाही, पोलीस यंत्रणा कोणाच्या दबावात काम करणार नाही. याचबरोबर पवनचक्की कंपन्यांच्या गुडांनी जो गुन्हेगारीचा आलेख वाढविण्याचे काम केले आहे तो आलेखही कमी होईल, गुंडगिरीचा वापर करत असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांवर गुन्हे दाखल करावेत असेही पत्रात म्हटले आहे. याविषयावर केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी तातडीने ठोस पाऊले उचलली जातील, असे आश्वासन दिले.

## पान १ वरून...

### लाडकी बहीण योजनेच्या

सोशल मीडियावर माहिती देताना आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून याबाबतीत मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाज माध्यमांतून होणाऱ्या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये, असे आवाहन आदिती तटकरे यांनी केले आहे.

---------------

### कापसावर बोंडअळी, वेचणीला

रोटावेटर किंवा नांगर फिरवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

-------------

### महराष्ट्रात लवकरच

आघाडीला घवघवीत यश मिळाले. या निकालानंतर सत्ताधाऱ्यांचा आत्मविश्वास बराच वाढला आहे. असे असतानाच आता भाजपाकडून राज्यामध्ये मोठी राजकीय खेळी केली जाईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि भाजपामधील संघर्ष शिगेला पोहचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

------

### पवार साहेबांच्या वाढदिवसाच्या

८४ विशेष कार्य केलेल्या महिला यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यासोबतच विविध उपक्रम घेतले जाणार आहेत. या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

------------

### कोविडपेक्षा घातक व्हायरसचे

जीव गमवावा लागला. ऑस्ट्रेलियातून एक भयानक बातमी आली असून कोरोनासारख्या घातक विषाणूचे शेकडो नमुने प्रयोगशाळेतून गायब झाल्याचे समोर आले आहे. क्वीन्सलँडचे आरोग्य मंत्री टिम निकोल्स यांनी जाहीर केले आहे की, लाइव्ह व्हायरसचे ३२३ नमुने आता गहाळ झाले आहेत. यामध्ये हेंड्रा व्हायरसचे सुमारे १०० नमुने, हंता व्हायरसचे नमुने आणि लस्सा व्हायरसचे २२३ नमुने समाविष्ट आहेत. हे सर्व विषाणू मानवांसाठी अत्यंत धोकादायक आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा देशावर टांगती तलवार असल्याची भीती संशोधकांकडून वर्तवण्यात येत आहे. या प्राणघातक विषाणूंचे नमुने गायब झाल्यानंतर जगभरात खळबळ उडाली आहे. कारण क्वीन्सलँडच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, हे नमुने शस्त्रे म्हणून वापरले जाऊ शकतात. यासोबतच हे काम कुणी सामान्य व्यक्तीने केलेले नसून ते एखाद्या तज्ज्ञाने केले असावे, असा दावाही त्यांनी केला आहे. २०२१ मध्ये नमुने गहाळ झाले, परंतु याचा तपास ऑगस्ट २०२३ मध्ये लागल्याचे, डेली मेल वृत्ताने म्हटले आहे.

-------------

### मुहुर्त ठरला; १४ डिसेंबरला

अजित पवार हे दिल्ली दौऱ्यावर असून ते पक्ष नेतृत्वाबरोबर बैठक घेऊन चर्चा करणार आहे. तर गुरुवारी महायुतीच्या नेत्यांची बैठक होऊन खातेवाटपावर शिक्कोमोर्तब होणार असल्याचे समजते.

राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळूनही १२ दिवस सरकार स्थापन झाले नव्हते. त्यामुळे वेगवेगळ्या चर्चांना यावेळी उधाण आले होते. मुख्यमंत्री फडणवीस होणार की आणखी कोणी वेगळा होणार याविषयी सुध्दा तर्कवितर्क लावण्यात येत होते. शेवटी फडणवीसांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सुध्दा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असली तरी अद्याप खातेवाटपामुळे मंत्रीमंडळ शपथविधी मात्र लांबणीवर गेला आहे. खातेवाटपाची चर्चा अंतिम स्तरावर असून फडणवीस आणि अजित पवार बुधवारी दिल्ली दौऱ्यावर गेले असून ते तेथे पक्ष नेतृत्वाशी चर्चा करणार असून गुरुवारी महायुतीच्या नेत्यांची बैठक होणार असून याच बैठकीत खातेवाटपावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे समजते. शिवाय मंत्रीमंडळ विस्तार हा १४ डिसेंबरला होणार असल्याची विश्वसनीय माहिती असून नव्या-जुन्यांचा या विस्तारात समावेश केला जाणार असल्याचे समजते.

--------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १२ डिसेंबर २०२४


## परभणी घटनेच्या निषेधार्थ आज दिंद्रुड कडकडीत बंद

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

संविधान दिनानिमित्त बनविण्यात आलेल्या परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीस तोडफोड करून डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यावर दगडफेक केल्याच्या घटनेचा निषेध व्यक्त करत आज गुरूवार (१२ डिसेंबर) रोजी आंबेडकर अनुयायांच्या वतीने दिंद्रुड (ता.माजलगाव) शहर कडकडीत बंद ठेवण्यात येणार आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुजन समाजातील प्रत्येक व्यक्तीची अस्मिता असून त्यांच्या संदर्भात जर कोणी अपप्रवृत्ती जनक, वादग्रस्त विधान किंवा दगडफेक अशा पद्धतीने कृत्य करत असेल तर हे कुठेतरी निषेधार्थ असल्याचे पोलिसांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीला १० डिसेंबर रोजी परभणी येथे तोडफोड करण्यात आली असल्याने संबंधित घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी दिंद्रुड पोलीस स्टेशनला संबंध आंबेडकर अनुयायांच्या वतीने आज दिंद्रुड कडकडीत बंद करून जाहीर निषेध व्यक्त करण्यात येणार आहे.

# मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांसाठी माजलगावात एका तासांत १४ लाखांचा मदतनिधी जमा

### शुक्रवारी शहरामध्ये मदतफेरीचे आयोजन; सात दिवस मदत संकलीत करण्यात येणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून निर्घुण हत्या केल्याची घटना घडली होती.या घटनेचे सर्वत्र पडसाद उमटले आहेत. माजलगावकरांनी मात्र कठीण काळात पाठिशी उभा राहण्याची परंपरा जोपासत मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना मदतीचा हात दिला आहे.दि ११ डिसेंबर बुधवार रोजी शहरातील विविध पक्ष व सामाजिक संघटनांच्या झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत अवघ्या एका तासांत १३ लक्ष ६८ हजार रूपयांची मदत निधी जाहिर झाली. दरम्यान,दि १३ डिसेंबर शुक्रवार रोजी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकातून सकाळी १०:०० वाजता मदतफेरीचे आयोजनही करण्यात आले असून यावेळी प्रशासनाला निवेदन देखील देण्यात येणार आहे.



शहरातील लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि ११ डिसेंबर बुधवार रोजी सायंकाळी ४:०० वाजण्याच्या सुमारास आमदार प्रकाश सोळंके यांच्यावतीने विविध सामाजिक संघटना,व्यापारी महासंघ,वकील संघटना,पतसंस्था संघटना,पत्रकार संघ,रोटरी क्लब व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.सांगली येथील जवान चंद्रशेखर मोरे यांच्या कुटूंबीयांना दिलेल्या मदतीप्रमाणेच देशमुख कुटूंबीयांना देखील मदत देण्यासाठी निर्णय घेण्यात आला. यानंतर मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना मदत व्हावी यासाठी दि १३ डिसेंबर शुक्रवार रोजी शहरामध्ये मदतफेरीचे आयोजन करण्यात आले असून सात दिवस मदत संकलन करण्यात येणार आहे. यासाठी या मदतफेरीस सर्व संघटना, पदाधिकारी, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. झालेल्या घटनेचा निषेध करत सरपंच संतोष देशमुख यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.दरम्यान, परभणी येथे संविधान अवमान घटनेचाही निषेध या सर्वपक्षीय बैठकीत करण्यात आला.दरम्यान मयत संतोष देशमुखांच्या कुटूंबीयास आर्थिक मदत म्हणून मदतफेरीचे आयोजन करण्यात आले असून मदतफेरीस सर्वांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन रोटरी क्लब, व्यापारी महासंघ, वकील महासंघ व पत्रकार संघाने केले आहे.

## संतोष देशमुख कुटुंबाची आमदार प्रकाश सोळुंके यांनी घेतली भेट

**धारूर । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मसाजोग येथे ९ डिसेंबर सोमवार रोजी दिवसाढवळ्या कर्तुत्वान आदर्श सरपंच संतोष देशमुख याचे दुपारच्या वेळेत अपहरण करून हत्या करण्यात आली. ही घटना वाऱ्यासारखी पसरली या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होत आहे.संतोष देशमुख कुटुंबाचे सांत्वन भेट घेण्यासाठी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी भेट देऊन आरोपीला तत्काळ अटक करण्यासाठी तसेच या आरोपीवर कठोर शासन करण्यासाठी वरिष्ठ प्रशासनाला पाठपुरावा करणार असल्याचे आ सोळंके यांनी सांगितले.

केज तालुक्यातील मसाजोग येथील संतोष देशमुख यांचे

### आरोपीला कठोर शासन करण्यासाठी पाठपुरावा करणार

### देशमुख कुटुंबाल दहा लाखाची आर्थिक मदत करणार – आ.प्रकाश सोळके

अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेच्या निषेध करत माजलगाव मतदार संघाचे आ आमदार प्रकाश सोळंके यांनी देशमुख कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच या घटनेतील राहिलेले आरोपी अटक करण्यासाठी व त्यांना कडक शासन करण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरा करणार असल्याचे सांगितले

तसेच ही घटना खूपच दुर्दैवी घडली आहे.

एखाद्या गावच्या प्रथम नागरिक असलेल्या व्यक्तीचे अपहरण होते, त्यानंतर त्याची हत्या करण्यात येते ही अत्यंत निंदनीय बाब आहे. दिवसाढवळ्या हत्या करण्याचे धाडस आरोपींनी केले आहे. या बीड जिल्ह्याचा तसेच कुटुंबाचा एक आदर्श व्यक्तिमत्व आपल्यातून हरवल्याची खंत यावेळी व्यक्त केली. या कुटुंबाला आर्थिक मदत दहा लाख रुपये त्यांनी जाहीर केले तसेच माजलगाव शहरांमध्ये शुक्रवार रोजी मदत फेरी काढून या कुटुंबाला आर्थिक मदत करून थोडासा हातभार लावण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

## महामानव अभिवादन ग्रुप तर्फे ७ व्या महार बटालियनच्या स्थापना दिनी माजी सैनिकांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सेवानिवृत्ती म्हणजे नियत कर्तव्यातून मुक्त होणेच नव्हे तर माजी सैनिकांनी सेवानिवृत्तीनंतर देखील समाज कार्य करून देश सेवा करावी असे प्रतिपादन कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले.भारतीय सैन्य दलातील महार रेजिमेंट ७ व्या बटालियनच्या ६५ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधून सैनिकाच्या अतुलनीय देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरता महामानव अभिवादन ग्रुपने धानोरा रोड बीड येथे बीड मधील माजी सैनिकांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी एस.टी. महामंडळ बीडचे सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक अरुण वाघमारे हे अध्यक्षपदी तर प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्रशांत वासनिक तर महामानव अभिवादन ग्रुपचे डी.जी वानखेडे,के.एस. वाघमारे, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक



यु.एस. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जी.एम भोले यांनी तर सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सेवानिवृत्त कॅप्टन राजाभाऊ आठवले, पंडितराव चक्रे, कैलास वाघमारे, सर्जेराव चक्रे, संदिपान जाधव यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी सांगितले की सुभेदार रामजी बाबांनी व नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सैन्यांमध्ये महार रेजिमेंट स्थापन करण्याकरता अथक प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नाला साजेल असेच कार्य सैनिकांनी देशसीमेचे रक्षण करून ७ व्या महार बटालियनच्या गोविंद कांबळे यांनी मरणोप्रांत वीर चक्र प्राप्त केले. भारत –चीन, भारत–पाकिस्तान, व कारगिल युद्धातील आणि तसेच काश्मीर व हिमालयातील अत्यंत जीव घेणे प्रसन्न सांगून त्यांनी सर्वांना स्तब्ध केले. याप्रसंगी पंडितराव चक्रे यांनी सैनिकी जीवना बद्दल माहिती दिली व डॉ. बाबासाहेबांच्या शिका संघटित व्हा,संघर्ष करा ह्या मूलमंत्र्याच्या आधारे पुढे गेलेल्यांनी आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून सेवानिवृत्तीनंतर समाज कार्य करत राहिले पाहिजे हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे असे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. प्रशांत वासनिक ,सेवानिवृत्त पी.आय.तानाजी शिंनगारे, पी.एस.आय.के.डी.भंडारे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास यशस्वी करण्याकरता बि.डी. तांगडे यांनी बहुमोल परिश्रम घेतले कार्यक्रमास उमाजी आठवले, बि.जी.दळवी अशोक ठोकळ, सोनवणे व शाक्या संघ सम्राट अशोका सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.

## गीता जयंती निमित्य तुळजाभवानीमाता मंदिर, बँक कॉलनी,शाहूनगर बीड येथे भागवत गीतेचे पारायण



**बीड । प्रतिनिधी**

गीता जयंतीचे औचित्य साधून तुळजाभवानी मंदिर बँक कॉलनी जाधव नगरी बीड येथे आध्यात्मिक शांतीपीठ श्रीक्षेत्र आळंदी देवाची यांचे महंत स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य हभप वेदांताचार्य वै.तुकाराम महाराज शास्त्रीजी महामुनी यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीमती महानंदा तुकाराम शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि हभप अरुणाताई भूते यांच्या शुभहस्ते अध्यात्म महिला स्वाध्यायमंडळ बीडच्या तपपूर्ती सोहळ्यानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात ८ ते ११ यावेळेत श्रीमद्भगवद्गीतेचे (१८अध्यायाचे) पारायण संपन्न झाले आहे. व्यासपीठ चालक म्हणून ह भ प सीमाताई सारंगकर व ह भ प मनीषाताई गायकवाड यांनी केले असून संपूर्ण पारायणाचे संचलन ह भ प अरुणाताई भुते यांनी केले आहे. तसेच बरोबर अकरा वाजता गीतेच्या पहिल्या अध्यायातील पहिला श्लोक, नवव्या अध्यायातील २२ वा श्लोक व गीतेच्या १८ व्या शेवटच्या अध्यायातील शेवटचा श्लोक याचे एकाच वेळी वाचन केले आहे. यावेळी पारायणासाठी २५ पुरुष व ७५ महिलांची उपस्थिती होती. परमार्थिक संस्कृती जतन करण्याचे एक फार मोठे योगदान दिसून येते.

## श्री.सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात गीता जयंतीनिमित्त सामूहिक गीता पठण

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील श्री.सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात गीता जयंतीनिमित्त सामूहिक गीता पठणाचे आयोजन करण्यात आले होते.मोक्षदा एकादशी दिनी गीता जयंतीनिमित्त सर्व पदाधिकारी, विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गीतेतील नवव्या अध्यायाचे अतिशय भक्तिमय वातावरणात पठण केले.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य श्री.प्रकाशभाऊ दुग्गड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.अमरनाथजी खुर्पे, शालेय समिति अध्यक्ष श्री.प्रशांतजी भानप, शाळेचे उपमुख्याध्यापक



श्री.विठ्ठल काळे,पर्यवेक्षक श्री.रवींद्र खोडवे, रा.स्व . संघाचे तालुका सहकार्यवाह श्री.प्रवीणजी येताळ, गीता परीवार सदस्या श्रीमती सरोज तोष्णीवाल, श्रीमती पूजा मानधने,स्वाध्याय परिवार सदस्य श्री.जयंत वैद्य, सेवानिवृत्त संस्कृत शिक्षक श्री.मल्हारी पटवारी हे उपस्थित होते.

प्रारंभी योगेश्वर भगवान कृष्णाच्या मुर्तीचे,श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाचे व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.प्रास्ताविकामधून श्री.मंगेश मुळी यांनी गीता जयंती व गीतेचे जीवनात असलेले महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर संस्कृत शिक्षक श्री.विजयकुमार सोन्नर यांच्या नेतृत्वाखाली सर्वांना गंधलेपन तसेच शंखनादाने प्रारंभ करत गीतेचा नववा अध्याय कुलस्वामिनी भंडारे कु गायकवाड या विद्यार्थिनींनी पुढे मुखोद्गत म्हटला व त्यांच्या मागे सर्वांनी पठण केला. यावेळी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता. भगवान श्रीकृष्ण आणि अर्जूनाच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वागत व परिचय श्री.मंगेश मुळी यांनी केले. तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार पर्यवेक्षक श्री.रवींद्र खोडवे यांनी मानले . श्री.विजयकुमार सोन्नर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## जि.प.प्राथमिक शाळा धामणगाव येथे सुंदर हस्ताक्षर व रांगोळी अक्षरलेखन कार्यशाळा संपन्न



**धामणगाव । प्रतिनिधी**

आज दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी जि प के प्रा शाळा धामणगाव येथे सुंदर हस्ताक्षर व रांगोळी अक्षरलेखन याविषयी कार्यशाळा अतिशय उत्कृष्टपणे घेण्यात आली सुंदर हस्ताक्षर तज्ञ व रांगोळी अक्षरलेखन श्री अनिल बेद्रे सरांनी सखोल असे विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर कसे काढावे याविषयी सर्व अक्षरांचे स्ट्रोक निहाय एक एक अक्षरांची स्ट्रोक समजावून सांगितले व काना मात्रा वेलांटी उकार याविषयी सुद्धा सविस्तर अशी सखोल माहिती सरांनी सांगितली त्याचबरोबर रांगोळी अक्षरलेखन याविषयी सुद्धा सविस्तर अशी माहिती दिली जि प के प्रा शाळेचे मुख्याध्यापक श्री हिरामण पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली ही हस्ताक्षर व रांगोळी अक्षरलेखन कार्यशाळा संपन्न झाली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री हिरामण पोकळे सर व सर्व शिक्षक वृंद धामणगाव व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### सुरेश धसांना कॅबिनेट

कोणत्याही परिस्थितीत न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आहेत अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. वेळोवेळी पोटतिडकीने त्यांनी सभागृहात मतदार संघाचे प्रश्न मांडले आहेत.कोरोनाच्या महामारीत देखील महाराष्ट्रात सर्वात अधिकचे कोविड सेंटर त्यांनी उभारून नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्रीपद देखील भुषविले आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून त्यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे त्यांच्या अनुभवाचा आष्टी विधानसभा मतदारसंघात सह संपूर्ण महाराष्ट्राला फायदा होईल गोरगरीब कष्टकरी यांच्या न्यायासाठी आमदार सुरेश धस कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे असल्याचे सुलेमान देवळा ग्रामपंचायतीचे उपसरपंच भाऊसाहेब घोडके यांनी सांगितले.

### सुलेमान देवळा ते अंभोरा

अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे.गेली कित्येक दिवसांपासून प्रवाशांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.लाखों रुपयांचा निधी येऊन सुद्धा दुरुस्ती होत नसेल तर हा पैसा जातो तरी कुठे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.संबंधित विभागाने या कडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर हे दोन्ही रस्ते दुरुस्त करावे,अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### सरपंच देशमुख यांच्या

संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध व्यक्त करून आरोपींना अटक करून कठोर कारवाई करावी व झालेली घटना निंदनीय आहे परंतू या घटनेला जातीय रंग देऊ नये आरोपींनी केलेले कृत्ये माफी लायक नसल्याने त्यांना ताबडतोब

अटक करून जलदगतीने प्रकरण चालवून त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. अशा भावना व्यक्त केल्या. यापुढे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने वेळीच लक्ष घालावे तसेच तालुक्यातील जनतेने यापुढेही सामाजिक सलोखा कायम ठेऊन एकमेकांशी वागावे असेही आवाहन केले आहे. दि. ११ रोजी या हत्ये प्रकरणातील तिसरा आरोपीला अटक

### सरपंच संतोष देशमुख

हत्या केली या घटनेचा बीड जिल्ह्यामध्ये संताप व्यक्त केला जात असून ठीक ठिकाणी आंदोलने होत आहे याचे पडसाद आता संपूर्ण महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात उमटल्याचे पहावयास मिळत असून आज या घटनेचा निषेध म्हणून वडवणी तालुका वाशीयांनी वडवणे बंदची हाक दिली असून त्यामध्ये सकल मराठा समाज व सर्व राजकीय पक्षाच्या वतीने आज वडवणी कडाकडीत बंद पाळला जाणार आहे अशा आशयाची निवेदन वडवणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आले आहे.

### बीड ते पिंपळनेर रस्त्याचे

वाहनधारक, रुग्ण यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे मणक्याचे व कमरेचे आजार वाहन धारकांना जडले आहेत. या रस्त्यामुळे या परिसरातील विकासाला खिळ बसली आहे. दरम्यान, रस्ता प्रश्नी नागरिक आक्रमक होताच किंवाआधिका–यांशी संपर्क करताच काही दिवस काम सुरू होते अन्? पुन्हा काम रखडते असा ४ वर्षातील अनुभव नागरिकांना आहे. त्यामुळे आता नागरिकांनी जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री यांना निवदेन दिले आहे. १५ दिवसांत रस्ता काम न केल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला ताकाने अभिषेक घालून आंदोलन करणार असल्याचे नागरिकांनी निवेदनात म्हटले आहे.

## विभागातील सर्व जिल्ह्यांनी ध्वजदिन निधी संकलन इष्टांक पूर्ण करावा– विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

देशाच्या सिमांचे रक्षण करण्याचे कर्तव्य बजावतांना प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती संपूर्ण देश नतमस्तक व कृतज्ञ आहे. अशा सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनासाठी दिला जाणारा इष्टांक पूर्ण करावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.

जिल्हा प्रशासन येत्या सन २०२५ पासून दर महिन्यातील एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असून या दिवशी सैनिकांचे, माजी सैनिकांचे,त्यांच्या अवलंबितांची कामे विशेषत्वाने मार्गी लावण्यात येतील,असा संकल्प जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ध्वजदिन निधी संकलन प्रारंभा प्रसंगी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आला. मौलाना आझाद संशोधन केंद्र येथील सभागृहात आज हा समारंभ पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर(निवृत्त) सय्यदा



फिरासत, मेजर सुभाष साळवे, विंग कमांडर जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क क्षीरसागर तसेच माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शहिद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात कामगिरी बजावणारे माजी सैनिक, त्यांचे पाल्य यांनाही गौरविण्यात आले.

आपल्या संबोधनात पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, कोणत्याही देशाच्या प्रगतीमागे देशाच्या सीमा सुरक्षित असणे हे सगळ्यात महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी योगदान देणारे सैनिक हे आपल्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत असतात. त्यासाठी ते प्रसंगी प्राणाचे बलिदान देतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञ असणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्याला ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी २० लक्ष रुपये इतके उद्दिष्ट असले तरी जिल्हा १ कोटी ५० लक्ष इतके निधी संकलन करुन राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल. या निधी संकलनात सगळ्यांनी आपला वाटा उचलावा. याशिवाय जिल्हा प्रशासन प्रशासकीय कामकाजात दर महिन्याला एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबवुन सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे प्रशासनाच्यास्तरावरची कामे पूर्ण करेल. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले की, विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात दिलेले ध्वजदिन निधी संकलनाचे इष्टांक प्राधान्याने पूर्ण करुन संपूर्ण विभाग ध्वजदिन निधी संकलनात अव्वल ठेवावा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच ध्वजदिन निधीत सढळ हाताने आपले योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते प्रत्येक नागरिकाने द्यावे,असे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविक मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत यांनी केले. सूत्रसंचालन गौतमी आव्हाड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# राज्यात ८ जिल्ह्यात कांदा पीकविम्यात मोठा घोटाळा

## लागवड अधिक दाखवून उतरवला विमा

महाराष्ट्राच्या आठ जिल्ह्यात कांद्याच्या पीक विमा उतरवण्यात मोठा घोटाळा झाल्याचं उघड झालं आहे. पुणे,अहिल्यानगर ,धुळे, सातारा, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि सोलापूर जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली नसताना पिकाचा पिमा उतरवला आहे. अनेक ठिकाणी कमी क्षेत्र असताना कांद्याची लागवड जास्त दाखवून विमा उतरवल्याचंही समोर आलंय. या आठ जिल्ह्यात ४ लाख २३९८ शेतकऱ्यांनी दोन लाख २४ हजार ३१८ हेक्टरवर कांदा पिकाची लागवड केली आहे. यात ८३ हजार ९११ शेतकऱ्यांनी ४९ हजार ९३५ हेक्टरवर कांदा लागवड न करताच विमा उतरवल्याचं समोर आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ६०२८५ शेतकऱ्यांनी २८ हजार ८६ हेक्टरवर कमी क्षेत्रात असताना देखील अधिकच्या क्षेत्रावर कांदा दाखवत विमा उतरवला. कृषी विभागाकडून विमा कंपन्यांना एक लाख ४७ हजार २७२ शेतकरी अपात्र करण्याच्या करणार सूचना विमा कंपन्यांना करणार असल्याचं सांगण्यात येत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या कांदा पीक क्षेत्र तपासणी अहवालानुसार, अधिकचे लागवड क्षेत्र दाखवून पीक विम्याची संरक्षिक केलेले अर्ज हे सोलापूर, सातारा, संभाजीनगर, नाशिकमध्ये सर्वाधिक असल्याचं या आकड्यांवरून दिसतंय.



राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये कांदा पीक विमा घोटाळा : राज्यातील आठ जिल्ह्यांमधील प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत कांदा पिकासाठी येणाऱ्या अर्जांमध्ये अधिकच क्षेत्र दाखवून पिक विमा उतरवल्याचा समोराला आहे. सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, बीड, सातारा, धुळे, पुणे व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये कमी क्षेत्र असताना कांद्याची लागवड जास्त दाखवून पिक विमा उतरवला आहे. कृषी विभागाकडून विमा कंपन्यांना एक लाख ४७ हजार २७२ शेतकरी अपात्र करण्याच्या सूचना करणार असल्याचं प्रशासकीय सूत्रांचा म्हणणं आहे.

सोलापुरातून सर्वाधिक अर्ज


सोलापूर जिल्ह्यात कांद्याची लागवड अधिक आहे असं सांगून पीक विमा उतरवण्यासाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांची संख्या ही सर्वाधिक असून ते ४१ हजार ८६५ इतकी आहे. ३७ हजार २३० हेक्टर एवढं या जिल्ह्याचं कांद्याचं पेरणी क्षेत्र आहे. कृषी विभागाने केलेल्या तपासणी अंतिम कांदा पीक आढळून न आलेले यातील ३६,४३८ एवढे अर्ज आहेत.

## जनावरांतील त्वचा आजारांवर उपाय

जनावरे त्वचेच्या विविध आजारांमुळे प्रभावित होऊ शकतात. यातील काही आजार हे जिवाणू, बुरशी, परजीवी आणि विषाणूंमुळे होतात. काही आजार पर्यावरणीय घटकांमुळे किंवा पौष्टिक अन्न घटक कमतरतेमुळे होतात.दाद (डर्माटोफायटोसिस): दाद हा एक बुरशीजन्य संसर्ग आहे, ज्यामुळे त्वचेवर वर्तुळाकार, सुजलेले व्रण आणि त्वचा खवलेदार होतात. हा आजार जनावरांमध्ये अत्यंत संक्रमक आहे. मानवांमध्ये देखील संक्रमण होऊ शकते.उपचार : सामान्यत: अँटीफंगल औषधे आणि प्रभावित जनावरांना वेगळे ठेवावे. मेंज/ खरूज संसर्ग : मेंज सूक्ष्म कीटकांमुळे होतो. सारकॉप्टिक मेंजमुळे तीव्र खाज सुटते आणि केस गळतात. कोरिओप्टिक मेंज प्रामुख्याने खालच्या पायांवर परिणाम करते. उपचारांमध्ये ॲकॅरिसाइड्स आणि योग्य स्वच्छता यांचा समावेश आहे. बोवाइन पॅप्युलर स्टोमाटायटीस: विषाणूजन्य आजारामुळे तोंडावर आणि तोंडाभोवती लहान, उंचावलेले आणि लाल पुरळ येतात. हा आजार स्वयं-मर्यादित असतो. उपचारांशिवाय बरा होतो.

उवांचा प्रादुर्भाव: उवांच्या विविध प्रजातींचा प्रादुर्भाव होऊ शकतो, यामुळे खाज सुटणे, केस गळणे आणि त्वचेची जळजळ होऊ शकते. जनावरांची स्वच्छता ठेवावी.

जिवाणूंमुळे होणारे आजार : त्वचारोग आणि स्टेफिलोकोकल त्वचा आजाराचे संक्रमण होऊ शकते.उपचार : जनावरांची चांगली स्वच्छता ठेवावी. तातडीने औषधोपचार करावेत.



फोटोसेन्सिटायझेशन (प्रकाशसंवेदी आजार): जेव्हा जनावरे विशिष्ट वनस्पती किंवा रसायने खातात,त्यामुळे त्यांची त्वचा सूर्यप्रकाशासाठी अधिक संवेदनशील होते. तेव्हा फोटोसेन्सिटायझेशन होऊ शकते. आजारामुळे तीव्र सनबर्न, फोड आणि त्वचा सोललेली दिसते. आहारातून अपायकारक घटक काढून टाकावेत. जनावरे सावलीत बांधावीत. मस्सा/वार्ट (पॅपिलोमा): बोवाईन पॅपिलोमाव्हायरस विषाणूमुळे हा आजार दिसतो. मस्सा हे सामान्यत: लहान असतात. त्वचेवर वाढतात. यावर पशूतज्ज्ञांच्याकडून योग्य उपचार करणे गरजेचे आहे. एलर्जीक प्रतिक्रिया: जनावरांना विशिष्ट वनस्पती, कीटक किंवा पर्यावरणीय घटकांमुळे त्वचेची ॲलर्जी होऊ शकते.

## रब्बी पिकांमध्ये कोळपणी, संरक्षित सिंचन महत्त्वाचे

करडई,ज्वारी आणि हरभरा पिकांमध्ये कोळपणी करावी. वाढीच्या टप्प्यात पिकाला संरक्षित पाणी द्यावे. ऊस पिकाला पाटपाणी पद्धतीने सिंचन करताना एकआड एक सरीतून द्यावे.पाण्याच्या ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली, तसेच वाळलेली पाने काढून आच्छादन म्हणून सरीत पसरावीत, त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते.रब्बी ज्वारी : पीक उगवणीनंतर ८-१० दिवसांनी पहिली विरळणी करावी. त्यानंतर ८-१० दिवसांनी दुसरी विरळणी करून हेक्टरी रोपांची संख्या योग्य ठेवावी. हेक्टरी १.२० ते १.३५ लाख झाडे. कोरडवाहू ज्वारीस पेरणीनंतर ३, ५ व ८ आठवड्यांनी एकूण तीन कोळपण्या कराव्यात. आवश्यकतेनुसार १ ते २ निंदण्या कराव्यात. म्हणजे जमिनीच्या पृष्ठभागावर भेगा पडणार नाहीत आणि जमिनीवर ओलावा टिकून राहील. तणांचा बंदोबस्त होईल. रब्बी हंगामात जमिनीतील जवळवास ६० ते ७० टक्के ओलावा बाष्पीभवनामुळे कमी होतो. जमिनीतील उपलब्ध ओलावा



टिकविण्यासाठी शेतातील काढलेले तण, पालापाचोळा, गव्हाची काडे, तूर काटके इ.चा वापर ज्वारी पेरल्यापासून ५० दिवसांच्या आत आच्छादन म्हणून करावा. शक्य झाल्यास कमकुवत झाडे काढावीत. संरक्षित पाणी व्यवस्थापन करावे. एकाच पाण्याची सोय असल्यास पीक ३५-४० दिवसांचे असताना किंवा पीक पोटऱ्यात असताना पाणी द्यावे.पाणी मोकाट पद्धतीने न देता पट्टा पद्धतीने द्यावे. : करडई : पीक उगवणीनंतर २५-३० दिवसांनी विरळणी करून दोन रोपांतील अंतर २० सें.मी. ठेवावे. पीक उगवणीनंतर २५-३० आणि ४५-५० दिवसांनी दोन निंदण्या व कोळपण्या कराव्यात. पाणी सोड ओळ पद्धतीने किंवा रुंद वरंबा पद्धतीद्वारे द्यावे. सोड ओळ पद्धतीने पिकाच्या दोन ओळींनंतर एक ओळ पेरणी न करता सोडून द्यावी. सोडलेल्या ओळीतून सरी पाडून त्या सरीने पिकास पाणी द्यावे. सुरुवातीच्या अवस्थेत तुषार सिंचनाचा वापर करावा. पिकाच्या संवेदनशील अवस्थेत (पीक फुलावर येते वेळेस व बोंडात करडई भरण्याची) पाणी द्यावे.गहू : गव्हाची एकेरी पेरणी करावी. वेळेवर आंतरमशागत करावी. त्यामुळे तणाचा नायनाट होईल. तसेच ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. पेरणीनंतर ३०-४० दिवसांच्या आत गरजेप्रमाणे १-२ वेळा खुरपणी करावी.आच्छादनाचा वापर करावा. कमी प्रमाणात ओलिताची सोय असेल तर पाण्याच्या पाळ्याचे खालील प्रमाणे नियोजन करावे.

## मोत्याची शेती शेतकऱ्यांना ठरतेय फायदेशीर

मोती शेती या व्यवसायाला आज कोणत्याही ओळखीची गरज नाही. ज्याप्रमाणे मत्स्यपालन, कुक्कुटपालन, मधमाशीपालन हे फायदेशीर रोजगार म्हणून ओळखले जातात, त्याचप्रमाणे मोत्यांची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो. याकडे तरुण शेतकऱ्यांचा कल वाढत चालला आहे.

समुद्रातून मोती काढणे आता भूतकाळातील गोष्ट झाली आहे, आता मोती शेतीचे काम प्रशिक्षण घेऊन शिकता येते. देशात असे हजारो शेतकरी आहेत जे मोत्यांच्या शेतीतून अनेक पटींनी नफा कमावतात. आज आपण मोत्यांच्या शेतीबद्दल सविस्तर माहिती जवळून जाणून घेऊया.


मोत्याची शेती म्हणजे काय?

मोत्याची शेती हा मत्स्यपालन व्यवसायाचा एक भाग आहे. या व्यवसायात ऑयस्टर पाळले जातात. ज्यातून खूप महागडे मोती मिळतात. फायद्याच्या दृष्टिकोनातूनही मोत्यांची शेती हा शेतकऱ्यांसाठी चांगला पर्याय आहे. तसेच मोत्यांची उत्पादन ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये ऑयस्टर ८-१० महिने पाण्यात पाळले जातात.

अशा प्रकारे मोती तयार केले जातात मोती हे एक नैसर्गिक रत्न आहे जे ऑयस्टरमध्ये तयार होते. ऑयस्टर म्हणजे गोगलगायीचे घर. जेव्हा गोगलगाई अन्न खाण्यासाठी घरातून बाहेर पडते तेव्हा नको असलेले परजीवी देखील त्याच्याशी चिकटून शिंपल्याच्या आत प्रवेश करतात, ज्यापासून मुक्त होण्यासाठी गोगलगाय स्वतःवर एक संरक्षक कवच बनवू लागते, जी नंतर मोत्याचे रूप धारण करते. होय, हे मोत्यांची निर्मिती ही नैसर्गिक प्रक्रिया आहे.जेव्हा ही प्रक्रिया कृत्रिमरित्या केली जाते तेव्हा त्याला मोती पालन म्हणतात. सरासरी एका मोत्याची किंमत दोनशे ते दोन हजारांपर्यंत असते आणि जर मोती उच्च दर्जाचा असेल तर त्याची किंमत लाखांपर्यंत असू शकते.

मोत्याची शेती कशी सुरू करावी -

मोती शेतीचा रोजगार सुरू करण्यासाठी २० १० आकारमानाचा तलाव लागेल, ज्याची खोली



५ ते ६ फूट असेल. ही सुविधा उपलब्ध नसली तरी अल्प प्रमाणात प्रगत तंत्रज्ञान वापरून घरच्या घरी टाकी बनवून मोत्याची शेती करता येते.

मोत्यांच्या शेतीसाठी प्रौढ ऑयस्टरची आवश्यकता असेल जे नदी, तलाव, कालवे इत्यादी ठिकाणांहून गोळा केले जाऊ शकतात. नाहीतर आपण ऑयस्टर देखील खरेदी करू शकता. ऑयस्टरचा आकार सुमारे ८-१० सेमी असावा. यापैकी एकही ऑयस्टर मेलेला नसावा आणि सर्व प्रौढ आहेत याची काळजी घेऊन हे अत्यंत काळजीपूर्वक निवडले पाहिजेत.

तुम्हाला हव्या त्या मोत्याच्या आकारानुसार बी निवडावे लागते. बिया शस्त्रक्रियेने ऑयस्टरमध्ये घातल्या जातात आणि १० दिवस नायलॉन पिशवीत ठेवल्या जातात आणि नंतर तपासणी केली जाते.

या काळात ते नैसर्गिक खाद्यावर ठेवले जाते आणि कोणतेही ऑयस्टर मरण पावले तर ते फेकून दिले जाते. तलावात सीप टाकल्यानंतर त्याची विशेष काळजी घेतली जाते. शिंपल्यातील जीव स्वतःचे अन्न स्वतः बनवू शकत नाहीत, म्हणून त्यांना बाहेरूनच खायला द्यावे लागते, त्यांचे अन्न शेणखत, केळीची साल इ. पर्ल फार्मिंगमधील खर्च आणि कमाई जेव्हा तुम्ही पहिल्यांदा मोत्यांची शेती सुरू करता, तेव्हा एक निश्चित खर्च असतो ज्यामध्ये फक्त एकदाच तलाव, सर्जिकल हाऊस स्थापित करणे आवश्यक असते जेथे शस्त्रक्रिया करण्याचे काम केले जाते. हा खर्च प्रत्येक वेळी येणार नाही.

मोत्यांच्या शेतीसाठी सर्जिकल सेट आवश्यक असेल आणि सर्जिकल हाऊसमध्ये काही टेबल आणि खुर्च्या आवश्यक असतील, ही देखील एक वेळची गुंतवणूक आहे.

याशिवाय तलावात वेळोवेळी खत टाकून ठेवावे लागते. तलावातील मृत शिंपले वारंवार बाहेर पडत राहतात, ज्यासाठी काही खर्च करावा लागतो. जर तुम्ही मोठ्या प्रमाणावर मोत्यांची शेती सुरू करत असाल तर कुशल कामगारांची गरज भासेल, त्यांचा खर्चही वेगळा द्यावा लागेल.

मोत्याच्या शेतीचे फायदे -

मोत्याची शेती केवळ आर्थिकच नाही तर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही फायदेशीर आहे. मोतीमुळे जलप्रदूषणा सारख्या समस्येपासून सुटका मिळू शकते, ते पाणी स्वच्छ करण्याचे काम करते, त्यामुळे पाणी घाण होण्यापासून वाचवता येते.

आज जिथे शेतकरी पूर, दुष्काळ यांसारख्या समस्यांना तोंड देत आहेत, तिथे ते मोती शेती, मत्स्यपालन यासारख्या व्यावसायिक शेतीला पारंपारिक शेती जोडून चांगले उत्पन्न मिळवू शकता. या सर्वांशिवाय, मोती हे एक रत्न आहे जे दागिने बनवण्यासाठी वापरले जाते ज्याची बाजारात चांगली किंमत आहे.

मोती शेतीची आव्हाने आणि त्यांचे उपाय-

मोत्यांच्या शेतीमध्ये येणारे सर्वात मोठे आव्हान म्हणजे निधीचे. आम्ही तुम्हाला येथे सांगतो की, सरकार लघु उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज देते. नाबार्ड सारख्या ग्रामीण बँकेतून तुम्हाला सहज पैसे मिळू शकतात जेणेकरून तुम्ही स्वतःचा रोजगार सुरू करू शकता. मुद्रा कर्ज देखील आहे जे तुमचा स्वतःचा उपक्रम सुरू करण्यासाठी लहान कर्ज देते. पारंपारिक शेतकरी मोत्यांची शेती कसं करू शकतात, हे माहीत नसताना, हा मोठा प्रश्न आहे. आज तरी हा एक मोठा प्रश्न नाही, कारण देशात अनेक ठिकाणी अशी प्रशिक्षण केंद्रे आहेत जिथे तुम्ही जाऊन मोत्यांची शेती शिकू शकता.

किंवा जे आधीच मोत्यांच्या शेतीचा रोजगार करत आहेत त्यांनाही भेट देऊन शिकता येईल. स्वत:ची जमीन नसेल, तर मोत्यांची शेती कशी करायची, हा प्रश्नही मनात येतो.

जर तुमच्याकडे स्वतःची जमीन नसेल तर तुम्ही जमीन किंवा तलाव भाडेतत्त्वावर घेऊ शकता. त्याचा खर्च वाढेल, पण सरकारकडून मदत मिळाली तर काळजी करण्याची गरज नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८७ : ला पेनसिल्वेनिया हे अमेरिकेचेसंविधानस्विकार करणारे दुसरे राष्ट्र बनले.
१७५५ : डच इस्ट इंडिया कंपनीचे निकोबार येथे आगमन
१८०० : ला वॉशिंग्टन डीसी अमेरिकेची राजधानी बनले.
१८८२ : अनंदमठ या बंकिमचंद्र यांच्या कादंबरीचे प्रकाशन, याच कादंबरीमध्ये वंदे मातरम्? हे गीत आहे.
१८८४ : ला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांमध्ये क्रिकेट सामना खेळला गेला जो अधिकृत रित्या पहिला होता.
१९०१ : जी. मार्कोनी याला प्रथमच बिनतारी संदेशाचे अटलांटिक महासागर पार प्रक्षेपण करण्यात यश मिळाले.
१९११ : दिल्ली ही भारताची राजधानी करण्यात आली. या आधी कोलकाता ही भारताची राजधानी होती.
१९११ : ला जॉर्ज पाचवा भारतामध्ये आला होता.
१९१७ : ला इटली येथील फ्रेंच आल्प्स येथे फ्रान्स च्या सैन्याची रेल्वे रुळावरून रेल्वे घसरून ५४३ लोकांचा मृत्यू.
१९२३ : ला इटलीच्या गंगा मानल्या जाणाऱ्या नदीवरील बांध फुटल्यामुळे ६०० च्या जवळपास लोक मारल्या गेले होते.
१९३६ : ला चीन चे नेता च्यांग काई शेक यांनी जपान विरुद्ध युद्धाची घोषणा केली होती.
१९५८ : ला जिनिया हा देश संयुक्त राष्ट्र संघाचा सदस्य बनला.
१९६३ : ला केनियाला स्वातंत्र्य मिळाले.
१९७१ : संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्यात आले.
१९९० : ला टी. एन. शेषन हे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त बनले.
१९९६ : ला भारत आणि बांग्लादेश यांच्या मध्ये ३० वर्षापर्यंत गंगेचे पाणी वाटण्याच्या करारा वर सह्या झाल्या होत्या.
२००१ : पृथ्वी या क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली.
२००१ : आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार
२००१ : ला भारताने नेपाळ ला दोन चीता हेलिकॉप्टर आणि काही अवजारे दिली होती.
२००८ : ला कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री एम वीरप्पा मोइली यांनी सरकारी कर्मचारी यांच्या सेवा मंडळांमध्ये बदलाव करण्यासाठी शिफारस केली.
२०१६ : प्रियांका चोप्रा यांना युनिसेफ सदिच्छा दूत म्हणून नेमण्यात आले.
२०२१ : हरनाज कौर संधूने मिस युनिव्हर्स २०२१ जिंकली

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८१ : वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक हॅरी वॉर्नर यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १९५८)
१८७२ : डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे राजकीय नेते, हिन्दू महासभेचे संस्थापक, अध्यक्ष आणि सरचिटणीस, लष्करीकरणाचे प्रवर्तक आणि नाशिक येथील 'भोंसला मिलिटरी स्कूल'चे संस्थापक (मृत्यू: ३ मार्च १९४८)
१८९२ : गौरीशंकर गोवर्धनराम जोशी तथा 'धूमकेतू' गुजराथी कथाकार व कादंबरीकार. त्यांच्या ७ उत्कृष्ट कथांचा संग्रह 'सप्तपर्ण' या नावाने प्रकाशित झाला आहे. (मृत्यू: ११ मार्च १९६५)
१९०५ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (मृत्यू: २८ सप्टेंबर २००४)
१९०७ : खेमचंद प्रकाश संगीतकार (मृत्यू: १० ऑगस्ट १९५०)
१९१५ : फ्रॅंक सिनात्रा हॉलिवूड मधील अभिनेते व गायक (मृत्यू: १४ मे १९९८)
१९१९ : ला भारतीय क्रिकेटर भाऊसाहेब निंबाळकर यांचा जन्म.
१९२७ : इंटेल कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक रॉबर्ट नोयस यांचा जन्म. (मृत्यू: ३ जून १९९०)
१९४० : शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री, संरक्षण मंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
१९४५ : संसद आणि लोकसभेचे सदस्य माजीद मेमन यांचा जन्म.
१९४९ : महाराष्ट्राचे लोकनेतेगोपीनाथ पांडुरंग मुंडेयांचा जन्म.
१९४९ : तमिळ तसेच हिंदी चित्रपटांचे अभिनेते रजनीकांत यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन व्यापारी आणि राजकारणी हरब धालीवाल यांचा जन्म.
१९५४ : मुंबई येथे २६/११ च्या झालेल्या दहशदवादी हल्यात शहीद झालेले हेमंत करकरे यांचा जन्म.
१९७३ : मराठी चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध सुपर स्टार भरत जाधव यांचा जन्म.
१९७८ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार उमेश कामत यांचा जन्म.
१९८१ : युवराजसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८४ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार संतोष जुवेकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३० : परदेशी मालाविरुद्ध निदर्शने करताना हुतात्मा बाबू गेनू याचा मोटारीखाली चिरडून मृत्यू (जन्म: ? ? १९०८)
१९६४ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (जन्म: ३ ऑगस्ट १८८६)
१९९१ : दत्तात्रय गणेश तथा अप्पासाहेब शेंबेकर शेतीतज्ञ व बागाईतदार, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे संस्थापक अध्यक्ष (१९६३ १९६६)
१९९२ : पं. महादेवशास्त्री जोशी साहित्यिक, भारतीय संस्कृतीकोषाचे व्यासंगी संपादक (जन्म: १२ जानेवारी १९०६ आंबेडे, सातेरी, गोवा)
२००० : जयदेवप्पा हलप्पा तथा जे. एच. पटेल कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (३१ मे १९९६ ७ आक्टोबर १९९९) (जन्म: १ आक्टोबर १९३०)
२००५ : रामानंद सागर हिन्दी चित्रपट निर्माते (जन्म: २९ डिसेंबर १९१७)
२००६ : सीगेट टेक्नोलॉजी चे सहसंस्थापक ॲलन शुगर्ट यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९३०)

# स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी जिल्हा उद्‌वस्त करू नका-राजेसाहेब देशमुखे

## मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण व परळीचे नामांकित व्यापारी अमोल डुबे यांचे खंडणीसाठी अपहरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

काल केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण व आज परळीचे नामांकित व्यापारी अमोल डुबे यांचे खंडणीसाठी अपहरण प्रकरण उघडकीस आल्याने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पुर्वी खंडणी, मर्डर, अपहरण, ब्लॅकमेल, रोड रॉबरी, माफियागिरी सारखे प्रकार मुंबई, पुणे, नागपूर सारख्या मोठ्या शहरात घडल्याचे ऐकायला मिळायचे. पण, सध्या असे सर्व गंभीर गुन्हे बीड जिल्ह्यात सर्वत्र सर्रासपणे घडत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात सर्वसामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख यांचा गुन्हेगारांवर कुठलाही धाक आणि वचक राहिला नसून कायदा आणि सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाने जगावे की, मरावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे बीड जिल्ह्यातील जनतेला आणखीन किती दिवस उघड्या डोळ्यांनी पहावे लागणार आहेत. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून कृपया स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी बीड जिल्हा उध्वस्त करू नका असे नम्र आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांना केले आहे.



आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचे अपहरण करण्यात आले आणि त्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच त्यांचा मृतदेह केज तालुक्यातील दैठणा परिसरात मिळून आल्याने खळबळ उडाली. या घटनेला १२ तास ही उलटत नाहीत, तोच परळीचे नामांकित व्यापारी अमोल विकास डुबे यांचे ही खंडणीसाठी अपहरण झाल्याची घटना काल रात्री परळी शहरातील औद्योगिक वसाहत परिसरात घडल्यानंतर या घटनेने शहरासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. परळी येथील पेट्रोल पंपाचे मालक विकास डुबे यांचे चिरंजीव व परळीच्या औद्योगिक वसाहती मध्ये बॅटरीचा व्यवसाय करणारे नामांकित व्यापारी अमोल विकास डुबे हे काल रात्री आपला व्यवसाय बंद करून घराकडे निघालेले असताना या परिसरात स्विफ्ट कार मध्ये दबा धरून बसलेल्या काही अज्ञांत आरोपींनी अमोल डूबे यांस गाठून मारहाण केली आणि स्विफ्ट कार मध्ये घालून अंबाजोगाईच्या दिशेने घाटात नेऊन अमोलला घरी कॉल करायला लावला व सदर आरोपीने रूपयांची मागणी केली. अशी चर्चा आम्हाला ऐकावयास मिळाली आहे. तसेच केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या केल्याच्या घटनेस १२ तास लोटले आहेत. हे दोन्ही प्रकार पाहून खरंच बीडचा बिहार झालाय या चर्चेला पुष्टी मिळत आहे. या दोन्ही प्रकरणांतील आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच कठोर कारवाई करावी. संतोष देशमुख हे अतिशय शांत, सुस्वभावी व्यक्तिमत्व अशी त्यांची पंचक्रोशीत ओळख होती. त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात सुपरिचित होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात मस्साजोग ग्रामपंचायतला अनेक पुरस्कार मिळवून दिले. अशा कर्तबगार व्यक्तीचा खून होणे ही घटना दुर्दैवी व मनाला प्रचंड वेदना देणारी आहे. या खूना मागे नेमका कुणाचा हात आहे..? हे शोधले पाहिजे. त्यामुळे संतोष देशमुख खून प्रकरणाचा व अमोल डुबे अपहरण प्रकरणाचा तपास हा सखोल व जलदगतीने करून आरोपींना कठोर शासन करावे, या दोन्ही प्रकरणांमुळे सुजाण नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून बीड जिल्ह्यातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. असे सांगून बीड जिल्ह्यात सर्वसामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख यांचा गुन्हेगारांवर कुठलाही धाक आणि वचक राहिला नसून कायदा आणि सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाने जगावे की, मरावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडतांना बीड जिल्ह्यातील जनतेला आणखीन किती दिवस उघड्या डोळ्यांनी पहावे लागणार आहेत. हा प्रश्नच आहे. कृपया स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी बीड जिल्हा उध्वस्त करू नका असे नम्र आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांना केले आहे.

# स्वाराती रूग्णालयात वॉर्डची संख्या वाढविण्यासाठी अधिष्ठातांना निवेदन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकिय रूग्णालयाच्या वॉर्ड ३५ मध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची व रूग्णांसाठी वॉर्डची संख्या वाढवा अशी मागणी समाजवादी पार्टीचे वतीने अधिष्ठातांना मंगळवार, दिनांक १० डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

समाजवादी पार्टीचे वतीने अधिष्ठातांना देण्यात आलेले निवेदन रूग्णालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर) दिलीप साबणे यांनी स्वीकारले. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकिय रूग्णालय हे आशिया खंडातील रूग्णांसाठी वरदान ठरले आहे. तसेच ग्रामीण भागातील सर्वांत मोठा दवाखाना असून मागील ४० वर्षांपासून वॉर्ड नंबर ३५ मध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्याची संख्या ही कमी असल्यामुळे नातेवाईकांना रूग्णांला घेवून आल्यानंतर उपचार मिळण्यास उशीर होतो. त्यामुळे अनेक रूग्णांना व नातेवाईकांना याचा त्रास होत आहे.

तसेच ओ.पी.डी.विभागात मलमपट्टी करण्यास एकच कर्मचारी असल्यामुळे रूग्णांना अनेकवेळा वाट पहावी लागते. तसेच ओ.पी.डी. मध्ये स्वच्छता असणे गरजेचे आहे. तसेच नातेवाईकांना बसण्यासाठी व्यवस्था, सि.टी.स्कॅन विभागाच्या बाजुच्या मंडपात घाणीचे साम्राज्य पसरले आहे ते स्वच्छ करण्यात यावे अन्यथा समाजवादी पार्टीच्या वतीने अंदोलन करण्यात येईल. असा इशारा संदरील निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे ॲड.शिवाजी कांबळे, (प्रदेश सचिव), राजेश परदेशी (शहराध्यक्ष, अंबाजोगाई), शेख शाकेर (शहर उपाध्यक्ष), सालेहा जिलानी शेख (महिला जिल्हाध्यक्ष, बीड) आणि शेख जिलानी (तालुकाध्यक्ष, अंबाजोगाई) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गायरान जमिनीची नोंद वर्ग-२ मधून वर्ग १ मध्ये घेण्यास तहसीलची टाळाटाळ

## सय्यद सलीमबापू यांचे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण




माजलगाव। प्रतिनिधी

८ फेब्रुवारी २०१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयानुसार गायरान जमीनची नोंद वर्ग क्र.२ मधून वर्ग-१ ला घेन्याचे परिपत्रक आहे.तरी फुलेपिंपळगाव शिवार सर्वे नंबर ९ व माजलगाव शिवारातील सर्व्हे नं.३३९ या गायरान जमीनी वर्ग दोन मध्येच आहेत.माजलगाव तहसीलदार कडुन यात दिरंगाई होत आहे.या नोंदी वर्ग १ मध्ये घेण्यात याव्यात या मागणीसाठी समाजसेवक सय्यद सलीमबापू व एडवोकेट ए.एन.सय्यद यांनी एसडीओ कार्यालयासमोर बुधवार दि.११ डिसेंबर रोजी आमरण उपोषण सुरू केले.

फुलेपिंपळगाव ता.माजलगाव गट नं.२० सव्र्व्हे नं.०९ तसेच माजलगाव शिवारातील सव्र्व्हे नं.३३९ या जमीनी गायरान जमीनी आहेत.व या जमीनीची नोंद ७/१२ पत्रकाला वर्ग-२ म्हणूनच आहे. वरील शासन निर्णय प्रसिध्द झालेला आहे.व त्या शासन निर्णयानुसार गायरान जमीन ही वर्ग-१ मध्ये आदेश पारीत केलेला आहे.त्या आदेशानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील मिळकत वर्ग-१मध्ये करण्यात यावी,याबाबत आपले कार्यालया मार्फत कार्यवाही करण्यात यावी असे आदेशित केले आहे.व तहसिलदार माजलगाव यांना वरील मिळकत वर्ग-१ मध्ये करण्याचे आदेश देण्यात यावेत.अशाही सूचना आहेत.परंतु सदरील प्रकरणात माजलगाव तहसील कार्यालयाकडून दिरंगाई करण्यात येत आहे.त्यामुळे गायरान जमिनी बाबत शासन निर्णयानुसार माजलगाव शिवारातील सर्वे नंबर ३३९ व फुलेपिंपळगाव शिवारातील सर्वे नंबर ९ या वर्ग २ मधून १ एक मध्ये घेण्यात याव्यात या मागणीसाठी समाजसेवक सय्यद सलीम बापू व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट ए.एन. सय्यद यांनी उपविभागीय कार्यालया समोर बुधवारी सकाळी उपोषण सुरू केले आहे.उपोषणाला शेख इलियास मासूम. समीर सिद्दीकी. शेख महमूद महेबूब. तात्यासाहेब सुखदेव साळवे. संतोष सीताराम. संदीपण महादू साळवे. यादव तुकाराम साळवे. सचिन सीताराम साळवे. श्रेयस निवृत्ती साळवे. महिंद्र शामराव साळवे. बाबासाहेब शेषेराव डोंगरे. हे सर्व उपस्थित होते

# भाजी मंडई येथील महात्मा फुले यांच्या नावाची कमान पूर्वव करा

## महात्मा फुले सेवा संघाचे मागणीपर निवेदन

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील अतिशय जुनी अशी महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडई ही सर्वदूर परिचित आहे. त्या भाजी मंडईत अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शेतकरी आपला भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येतात. या भाजी मंडई मध्ये येण्यासाठी प्रवेशद्वारावर महात्मा फुले भाजी मंडई नामक फलक असलेली कमान होती . मात्र शहरातील विकास कामाच्या नावाखाली सदरील कमान काढून टाकण्यात आले आहे. काढण्यात आलेली ती कमान पुन्हा उभा करावी या मागणीचे निवेदन मुख्याध्याकारी नगर परिषद अंबाजोगाई यांच्याकडे महात्मा फुले सेवा संघाच्या वतीने देण्यात आले आहे. या निवेदनावर महात्मा फुले सेवा संघाच्या अनेक सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनात दिलेली याबाबत सविस्तर माहिती अशी की , निवेदनात सर्वप्रथम



मनोहर अंबा नगरीत रस्ते व इतर कामाच्या स्वरूपाने जी काही विकास कामे झाली आहेत व होऊ पाहत आहेत . त्यामुळे नक्कीच अंबानगरीच्या वैभवात भरच पडत आहे त्याबद्दल अंबाजोगाई नगर परिषदेचे अभिनंदन केले आहे. अंबाजोगाई शहरातील भाजी मंडई भागात विकास काम (पाटील चौक ते श्री योगेश्वरी देवी मंदिर सिमेंट मार्ग) दरम्यान, महात्मा फुले भाजी मंडई, अंबाजोगाईची प्रवेश कमान काढण्यात आली होती, ती प्रवेश कमान लवकरात लवकर पूर्णवत लावावी / बसवावी अशी विनंती महात्मा फुले सेवा संघाच्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांच्याकडे केली आहे. अंबाजोगाई नगर परिषदेत देण्यात आलेल्या निवेदनावर शरद पांडुरंग माळी , गणेश मूकुंदराव जाधव,गणेश सुंदर आठाव,महेश दादाराव सपाटे,गजानन जगन्नाथ घोडके, प्रथमेश रमाकांत देशमाने, नितीन रामराव जिरे, बालासाहेब काशीनाथराव मसने, ऋषिकेश शिवाजीराव पाथरकर,दिनेश अशोकराव घोडके, अशोक गणपतराव बलुतकर, राम वसंतराव घोडके, वसंत दत्तात्रय घोडके,दत्ता नामदेव राऊत , पंकज गणेश राऊत,बलूतकर नंदकुमार मधुकर ,जिरे अमोल बालासाहेब, पवन प्रकाशराव जिरे, अमोल नागोराव धोडके राम मुकूंद, विशाल वैजनाथ कंठीकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राजेंद्र गोरे यांची अध्यक्षपदी निवड



पाटोदा। प्रतिनिधीफ़

पाटोदा येथील शिक्षक श्री राजेंद्र गोरे सर यांची लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेली असून त्यांचा या निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्याकडुन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था पाटोदा च्या अध्यक्षपदी जेष्ट संचालक श्री.राजेंद्र गोरे यांची नुकतीच एकमताने बिनविरोध निवड झालेली असून निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी भेट देऊन गोरेसर यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळीश्रीहरी गिते नगरसेवक,डिगांबर नाईकनवरे,पत्रकार गणेश शेवाळे,पत्रकार सुनिल नाईकनवरे,डॉ.उद्धव गोरे,तुकाराम रंधवे,रंधवेसर,आरूण गवळी आदींची उपस्थिती होती.

# बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अन्यायाविरोधात पाटोद्यात रॅली

पाटोदा। प्रतिनिधी

बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अन्यायाविरोधात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय पर्यंत पायी रॅली काढून तहसीलदार यांना निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला आहे. बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून दि.१० डिसेंबर रोजी पाटोदा शहरात हिंदू न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय दरम्यान हिंदू न्याय यात्रा पायी रॅली संपन्न झाली.

बांग्लादेशात हिंदुवर आणि अन्य अल्पसंख्य समुदायावर



अनन्वित अत्याचार होत आहे. संयुक्त राष्ट्र आणि मानवाधिकार परिषद याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. बांग्लादेशात हिंदू संत,मंदिर,हिंदू संस्था जाळली जात आहेत.तेथील हिंदू महिलांवर अमानविय पध्दतीने अत्याचार होत आहेत.आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने यांची दखल घ्यावी तेथील हिंदू बांधवांना न्याय द्यावा.अशी मागणी पाटोदा हिंदू बांधवांनी निवेदनाद्वारे पंतप्रधान यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी ह.भ.प राधाताई महाराज सानप, ह.ब.प.लक्ष्मण सस्ते,ह भ प.खाडे महाराज, ह.भ.प.पवळ महाराज, सोमिनाथ कोल्हे , सतिष घोलप, महादेव जाधव, अनिकेत राख, राजेंद्र गोरे,अजय जोशी, महेश बेदरे,प्रशांत (काका) देशमुख, अंगद सांगळे,सह हिंदू बांधवा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गीतेचा मुख्य उद्देश कणखर व मजबूत राष्ट्र निर्मिती हा आहे : प्रमोद कोष्टगावकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि. ११ डिसेंबर २०२४ कुरुक्षेत्राच्या रणांगणावर पाच हजार वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णांनी गलितगात्र झालेल्या अर्जुनाला जो उपदेश केला तो श्रीमद्? भगवद्गीतेच्या रूपाने महर्षी व्यासांनी लिखित स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोंचवला. एका तरुणाने म्हणजे भगवान श्रीकृष्णाने दुसऱ्या तरुणाला म्हणजे अर्जुनाला केलेला हा उपदेश म्हणजे चिरतरुण तत्त्वज्ञान आहे. गीता सांगण्याचा मूळ उद्देश अर्जुनाला राष्ट्रधर्म निभावण्यासाठी प्रेरित करणे हा होता तसेच गीतेतील उपदेशांचे संस्कार घेऊनच छ. शिवाजी महाराज, पु. अहिल्यादेवी होळकर आदी महान व्यक्ती घडल्या. त्यामुळे गीतेचा मुख्य उद्देश कणखर, मजबूत व शक्तिशाली राष्ट्राची निर्मिती करणे हा आहे असे प्रतिपादन श्रीमद्? भगवद्गीतेचे अभ्यासक व प्रशिक्षक प्रमोद कोष्टगावकर यांनी केले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयात गीता जयंतीनिमित्त आयोजित



कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर , प्रमुख अतिथी म्हणून भगवद्गीता अभ्यासक व दंतरोगतज्ञ डॉ. उल्काताई निसाले , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना प्रमोद कोष्टगावकर म्हणाले की, भगवद्गीता किंवा अध्यात्म यांचे चिंतन करणे हे म्हातारपणी करावयाचे काम आहे असा समज सध्याच्या धकाधकीच्या, व्यस्त जीवनक्रमात निर्माण झाला आहे, परंतु श्रीमद्? भगवद्गीता हा जीवन मार्ग दाखविणारा ग्रंथ आहे त्यामुळे तरुणांनी भगवद्गीतेचे अध्ययन व चिंतन केले पाहिजे. भगवतगीता तरुणांसाठी प्रेरक व उपयुक्त आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी दुसऱ्या प्रमुख अतिथी डॉ. उल्काताई निसाले आपल्या मार्गदर्शनात म्हणाल्या की, वेदातील तत्त्वज्ञान महर्षी व्यासांनी महाभारतात लिहिले, तर पुन्हा महाभारतातील नवनीत काढून गीता या काव्यग्रंथाची निर्मिती व्यासांनी केली, त्यामुळे गीतेचा अर्थ समजावून घेऊन त्याचे अध्ययन केले पाहिजे राष्ट्रासाठी तो एक अत्यंत मौलिक ग्रंथ आहे. श्रीमद्? भगवद्गीता ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग यांचा उपदेश करते. यातील कर्मयोगाचे आचरण विद्यार्थी जीवनात महत्त्वाचे ठरते असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना विजय वालवडकर म्हणाले की, आपण जयंती साजरी करतो ते एखाद्या महापुरुषाची किंवा मोठ्या व्यक्तींची परंतु जगातील हा एकमेव ग्रंथ आहे ज्याची जयंती साजरी केली जाते. हे श्रीमद्? भगवद गीतेचे वेगळेपण आहे. यातील तत्त्वज्ञान एका विशिष्ट कालापुरते मर्यादित नसून ते शाश्वत व चिरंतन आहेत आणि जोपर्यंत मनुष्याचे अस्तित्व या पृथ्वीवर आहे तोपर्यंत माणसांना मार्गदर्शक ठरणारे हे तत्त्वज्ञान राहणार आहे, त्यामुळेच आपले भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे परदेश दौऱ्यावर गेल्यानंतर तेथील राष्ट्र प्रमुखांना श्रीमद्? भगवद्गीता भेट देतात असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी देवी सरस्वती ,भगवान श्रीकृष्ण, श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ , छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदींच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिगंबर मुडेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मोहिनी वेडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अंजली देशमुख यांनी केले कार्यक्रमात चि. गजानन अंजान, चि. अर्जुन देशमुख ,कु. वेदश्री जड, कु. राजनंदिनी देशमुख, कु. प्रांजली सोमवंशी ,चि. सुरज सोळंके, चि. यश कान्हेगावकर आदी विद्यार्थ्यांनी श्रीमद्? भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायाचे व इतर श्लोकांचे पठण केले. संगीत विभागाच्या कुमारी नंदिनी कुलकर्णी व कुमारी क्रांती एडके यांनी राधा-कृष्ण यांच्या वेशभूषेत श्रीकृष्ण स्तुतीचे गायन केले .त्यांना प्रा. शैलेश पुराणिक व सौरभ कुलकर्णी यांनी पेटी व तबल्याची साथ केली. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड व डॉ. दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. आनंद पाठक, पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी व प्रा. जिजाराम कावळे तसेच सर्व प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि.१२ डिसेंबर २०२४ | ६

# सरपंच देशमुख यांच्या हत्येचे पडसाद राज्यभरात उमटले

## सरपंच संघटनेचे राज्याध्यक्ष दत्ता काकडे यांच्या आवाहनानंतर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये बंद, विविध संघटनांकडूनही निषेध

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे पडसाद राज्यभरात उमटले असून सरपंच संघटनेचे राज्याध्यक्ष दत्ता काकडे यांनी याचा निषेध केला आहे. दत्ता काकडे यांच्या नेतृत्वाखाली आष्टी येथे सरपंच संघटनेच्या वतीने रास्तारोको करून सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा छडा लावून आरोपींना कडक शासन करावे अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान त्यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी बंद पाळून या घटनेचा निषेध नोंदवावा असे आवाहन केल्यानंतर जिल्हाभरातील ग्रामपंचायतींनी कडकडीत बंद पाळला. दरम्यान विविध सामाजिक संघटनांनी या घटनेचा निषेध नोंदवत आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी केली. दरम्यान या प्रकरणातील तिसरा आरोपी घुले याला गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने पुण्यातून अटक केली. दरम्यान याठिकाणी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी भेट देवून हा प्रश्न सभागृहात प्रकर्षाने मांडू असे यावेळी सांगितले. दरम्यान माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनीही देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेवून आरोपीला कठोर शासन करण्यासाठी पाठपुरावा करणार अशी ग्वाही दिली. दरम्यान त्यांनी या कुटुंबाला दहा लाख रुपयांची मदत करणार असल्याचेही सांगितले.

दरम्यान आज गुरुवारी आष्टीचे आमदार सुरेश धस, मस्साजोग येथे भेट देणार आहेत.



मस्साजोग येथील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिक आक्रमक भूमिका घेत मस्साजोग येथे दि. ९ च्या रात्रीपासून महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केले. आरोपींना पकडल्यानंतरच अंत्यसंस्कार करण्यात येईल अशी भूमिका घेतली.

दि. १० रोजी या घटनेच्या निषेधार्थ केज शहर कडकडीत बंद ठेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको करण्यात आला. याला तालुक्यातील सर्व पक्षीय नेते, कार्यकर्ते, तरून, नागरिक यांनी सहभाग घेतला.

दोन आरोपी ताब्यात घेतले असल्याची पोलीसांनी दिली माहिती, तर बाकी आरोपी पकडून कठोर कारवाई करण्याचे दिले आश्वासन आंदोलकांच्या मागणीनुसार पि.आय. महाजन, पि. एस आय. पाटील यांचे पोलीस खात्याच्या वरिष्ठांनी तडकाफडकी निलंबन केले. सरपंच संतोष देशमुख यांचा दि. १० रोजी मस्साजोग येथे रात्री उशिरा करण्यात आला अंत्यसंस्कार, खा. रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, आ. नमिताताई मुंदडा यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे आरोपींना अटक करून कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे तर मा. रमेशराव आडसकर, मा. आ. पृथ्वीराज साठे, मा. रणजितसिंह पाटील, मा. हारूणभाई इनामदार, मा. नगराध्यक्षा सिताताई बनसोड, मा. भाई मोहन गुंड, मा. सुमंत धस, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले या सर्वांनी केज, मस्साजोग येथील आंदोलन स्थळी व देशमुख कुटुंबाची भेट घेऊन सरपंच ◀◀ पान ३ वर

# सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाच्या निषेधार्थ आज वडवणी बंदची हाक

वडवणी । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण पणेज्ञहत्या करण्यात आली या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र बीड जिल्ह्यात उमटत असून आज वडवणी शहरातही या घटनेचा निषेध म्हणून वडवणी बंदची हाक देण्यात आली आहे असे लेखी निवेदन सकल मराठा समाजाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.



बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यापासून गुन्हेगारीच्या घटनेमध्ये वाढ होत असून यामध्ये पोलीस प्रशासनाचा वचक राहिलेला नसल्यामुळे दिवसाढवळ्या अपहरण करून खून करण्याच्या घटना घडत आहेत यामध्ये बीडचा बिहार झाल्याची चर्चा संपूर्ण बीड जिल्हा नागरिकांमधून होत आहे यामध्ये गेल्या दोन-तीन दिवसापूर्वी केज तालुक्यातील मसाजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची काही गुंड यांनी निर्घृणपणे अपहरण करून ◀◀ पान ३ वर

# आष्टी तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको

## मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपीला अटक करा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील खडकत चौकात बुधवारी दुपारी १२ वा. आष्टी तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने रस्ता रोको करण्यात आला हा रस्ता रोको जवळपास एक ते दीडतास सुरू होता. यामध्ये मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करावी अशी प्रामुख्याने आंदोलनकर्ते याची मागणी होती.



यावेळी नायब तहसीलदार बाळदत्त मोरे यांना आंदोलनकर्त्यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनात असे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे निषेधार्थ सकल मराठा समाज आष्टी तालुक्याच्या वतीने शासन दरबारी मागण्या मांडत आहोत त्या लवकरात लवकर मान्य कराव्यात ,मुख्य आरोपी कोण आहे तो शोधून लवकरात लवकर अटक करण्यात यावी,कुटुंबीयांना पोलीस संरक्षण लवकर देण्यात यावं,खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा,सर्व आरोपींना फाशी झाली पाहिजे. या मागण्यांचे निवेदन उपस्थित असंख्य आंदोलनकर्त्यांकडून आष्टी तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने देण्यात आली.

# कृषी कार्यालयाचा भोंगळ कारभार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कृषी कार्यालयाचा कारभार सध्या सतत चर्चेचा विषय बनला आहे कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना आहेत व सरकारकडून कृषी विभागाला शेतकऱ्यांसाठी योजनेचा पाऊस पडतो परंतु त्या योजना शेतकऱ्यापर्यंत जातात का यावर मात्र कृषी अधिकारी यांचं कसलं नियंत्रण नसते बोलाचीच कडी बोलाचाच भात असा प्रकार सध्या आष्टी तालुका कृषी कार्यालयात पहावयास मिळत आहे सध्या रब्बी हंगाम तोंडावर आहे यंदा चांगला पाऊस झाल्याने पिकांना पाणी देण्यासाठी पण उपलब्ध आहे त्यासाठी अनेक शेतकऱ्यांना सौर पंप सेटअप व युरिया आवश्यक आहे मात्र कंपनी आणि त्यांची एजंट आज या उद्या या असे शेतकऱ्यांना झुलवत राहतात खड्डा खोदणे वाळू, सिमेंट हे शेतकऱ्यांना करावी लागत आहे मात्र त्याची पैसे संबंधित अधिकाऱ्याला हाताशी धरून त्यांचीच पोळी भाजून घेतात शेतकऱ्यांनी जगावं कि मरावं अशा भावना सध्या शेतकऱ्यांकडून ऐकावयास मिळत आहेत.

# सुरेश धसांना कॅबिनेट मंत्रीपदाची संधी द्यावी - उपसरपंच घोडके

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**



राज्यात महायुतीला ऐतिहासिक असा विजय मिळाला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात च्या सर्वांगीण विकासासाठी अठरापगड जातीला सोबत घेऊन गोरगरीब सर्वसामान्यांच्या सुख दुखात धावून जाणारे आमदार सुरेश धस हे विधानसभेच्या चौथ्या टर्म ला ८० हजाराचे मताधिक्य घेऊन मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले आहेत. विधानपरिषद वरही त्यांनी पाच वर्षे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने केले असून सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी व महिला सुरक्षित राहण्यासाठी मतदारसंघातील शेतकरी सुखावला पाहिजे शाश्वत विकासासाठी तरुणांच्या रोजगारासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे आहे.

यासाठी सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन मतदारसंघाला व मतदार संघातील नागरीकांना न्याय द्यावा अशी मागणी सुलेमान देवळा गावचे उपसरपंच बंडू भाऊसाहेब घोडके यांनी केली आहे पुढे बोलताना ते म्हणाले की आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या गावागावांमध्ये रस्ते, वीज, पाणी देवस्थानचा विकास भक्तनिवास, तरुणांना रोजगाराची संधी, मतदान संघाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासभिमुख नेतृत्व म्हणून सुरेश आण्णा धस यांची ओळख असून आमदार सुरेश धस हे लाडके नेतृत्व असून अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारे ◀◀ पान ३ वर



पाटोदा : श्री स्वामी समर्थ परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने आज पाटोदा सेवा केंद्रात गिता जयंती व मोक्षदा एकादशी निमित्त गीताई याग सेवा संपन्न झाली.



माजलगाव : विधानसभेच्या ५ व्यादा आमदार पदी आ.प्रकाश सोळंके यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करुन अभिनंदन करताना मोगरा ग्रामपंचायतीचे सरपंच गिन्यानदेव राठोड व उपसरपंच संदिप सावंत

# सुलेमान देवळा ते अंभोरा फाटा, म्हसोबावाडी फाटा ते सावरगाव रस्त्याची दयनीय अवस्था

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा ते अंभोरा फाटा म्हसोबा वाडी फाटा ते सावरगाव या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून प्रवास करने कठीण झाले आहे.दोन्ही रस्त्यांवर शेकडो खड्डे पडले असून काही ठिकाणी रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे हेच कळणे अवघड झाले आहे.



अधिक माहिती अशी की, अंभोरा येथे पोलिस ठाणे असल्याने व सुलेमान देवळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने या ठिकाणी परिसरातील नागरिकांची सारखी वर्दळ असते.तसेच सावरगाव मायंबा येथे देव दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची नेहमी गर्दी असते. या रस्त्यांवरून दुचाकी व चारचाकीने प्रवास करने म्हणजे चालक आणि प्रवाशांची कसोटीच.या ख़राब रस्त्यांमुळे ◀◀ पान ३ वर

# निवृत्ती मुंडे यांचे दुःखद निधन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

टोकवाडी येथील वीट उद्योजक, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते लक्ष्मण मुंडे यांचे वडील निवृत्ती मानाजी मुंडे यांचे रविवार दिनांक ८ डिसेंबर रोजी रात्री वृद्धापकाळाने दुःख निधन झाले मृत्यू समयी ते ९६ वर्षाचे होते.



टोकवाडी येथील प्रगतिशील शेतकरी निवृत्ती मानाजी मुंडे हे अतिशय मनमिळावू व धार्मिक स्वभावाचे होते. वृद्धापकाळाने गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यातच रविवार दिनांक ८ डिसेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. आज सोमवारी टोकवाडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. निवृत्ती मुंडे यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. मुंडे परिवाराच्या दुःखात आम्ही परिवार सहभागी आहे.

राख सावडण्याचा कार्यक्रम

दरम्यान कै. निवृत्ती मानाजी मुंडे यांचा राख सावडण्याचा कार्यक्रम उद्या मंगळवार दिनांक १० डिसेंबर रोजी सकाळी सात वाजता टोकवडी येथे संपन्न झाला.

# बेलगाव येथे श्री रेणुकाई देवी यात्रेनिमित्त लावणी सम्राज्ञी मयुरी उतेकर यांचा कार्यक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील श्री रेणुकाई देवी यात्रा उत्सवास शनिवार दि.१४ डिसेंबर दत्तजयंतीपासून प्रारंभ होत आहे.हा उत्सव तीन चालतो या यात्रा उत्सवात पहिल्या दिवशी संध्याकाळी रेणुकाई देवीची पालखी मिरवणूक (छबीना) मोठ्या उत्साहात होते तर रात्री ७ वाजता मुंबई येथील प्रसिद्ध डान्सर लावणी सम्राज्ञी मयुरी उतेकर यांचा कार्यक्रम होणार असून यावेळी प्रमुख आकर्षण म्हणून केबी लाईट्स,डीजेविनय,रेणुकाई साउंड असणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी रविवार दि.१५ डिसेंबर रोजी कुस्त्यांचा भव्य आखाडा होणार आहे.



बेलगांव ग्रामस्थ दरवर्षी रेणुकाई यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात.राज्याच्या कानाकोपऱ्यातुन भाविक -भक्त ,मल्ल या भव्य यात्रा व कुस्ती हंगामाला हजेरी लावतात. ग्रामस्थांकडून देवीच्या परिसरात निसर्गरम्य वातावरणात दरवर्षी ही यात्रा भरवली जाते.भाविकभक्तांनी रेणुकादेवीच्या यात्राउत्सव व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच,उपसरपंच, ट्रस्टअध्यक्ष,ग्रामपंचायत,बेलगाव ग्रामस्थ व रेणुकाई देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड ते पिंपळनेर रस्त्याचे काम रखडले

## सीएमच्या फोटोला नागरिक घालणार ताकाचा अभिषेक

बीड । प्रतिनिधी

बीड गेवराई व माजलगाव तालुक्याच्या रहदारीसाठी महत्त्वाचा असलेला राज्य महामार्ग ५५ बीड - तेलगाव नाका ते पिंपळनेर हा रस्ता पाच- सात वर्षापासून मोठ्या खराब झालेला आहे. या रस्त्याचे काम लवकर सुरु व्हावे यासाठी आता नागरिक आक्रमक झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या फोटोला ताकाचा अभिषेक घालून आंदोलन करण्याचा निर्णय नागरिकांनी घेतला आहे.

### नवे आमदार लक्ष देणार का?

राज्य महामार्ग ५५ च्या सुरुवातीस बीड मतदार संघातील काही गावे आहेत. परंतु या रस्त्यावरून मुख्यत्वे गेवराई मतदार संघातील जास्त लोकांचा संपर्क व रहदारी असते. पुढे जाऊन हा मतदारसंघ वडवणी व माजलगाव तालुक्यात जातो. तीन मतदारसंघात जाणाऱ्या रस्त्याला अद्यापही कोणी मायबाप नाही तेव्हा पहावा लागेल या रस्त्यासाठी नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित काही लक्ष देतात का? याकडे नागरिकांचे लक्ष आहे.

बीड ते पिंपळनेर रस्त्याची दुर्दशा झाल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम व्हावे या साठी दोन वर्षापूर्वी या भागातील तरुणांनी मोठी लोक चळवळ उभा करून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर धरणे आंदोलन केले होते. त्याच वेळेस या भागातील ५० ते ६० ग्रामपंचायतींनी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीवर बहिष्कार घालण्याचे ठरावही घेतले होते. त्यानंतर प्रशासनाला जाग आली व रस्त्याच्या काम सुरु करण्यात आले मात्र ४ वर्षे उलटूनही या रस्याचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या परिसरातील विद्यार्थी, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बर्थडे पार्टी पडली महागात! दिल्लीवरून पुण्यात आलेल्या विद्यार्थ्यानं दारूच्या नशेत महिला पोलीस कर्मचाऱ्याला उडवलं

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात काल रात्री एका महिला कॉन्स्टेबलला नाकाबंदी दरम्यान उडवल्याची घटना घडली आहे. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या चार चाकी कारने नाकाबंदीसाठी तैनात असणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्याला धडक दिली. पुणे स्टेशन परिसरात काल रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. या अपघातानंतर अज्ञात चार चाकी वाहनचालक घटनास्थळावरुन पळून गेला आहे. आज या घटनेबाबत पोलीस उपायुक्त स्मर्तना पाटील यांनी माहिती दिली आहे.

दिल्लीहून पुण्याला मित्राच्या बर्थडे पार्टीसाठी आलेल्या एका विद्यार्थ्याने दारूच्या नशेत एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला उडवण्याची धक्कादायक घटना घडली. रविवारी रात्री कोरेगाव पार्क परिसरात नाकाबंदीसाठी असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला उडवत दहा ते वीस मीटर पर्यंत एका चार चाकी वाहनाने फरपटत नेलं. या अपघातात ती महिला कर्मचारी गंभीररित्या जखमी झाली. याच प्रकरणात या कारचालकाला गाडीसह पुणे पोलिसांनी अटक केली असून अर्णव सिंघल असं अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अपघाताच्या दिवशी या आरोपीसोबत त्याचे आणखीन तीन ते चार मित्र गाडीत असल्याची देखील माहिती पुणे पोलिसांनी दिली आहे. अर्णव हा दिल्लीवरून खास त्याच्या मित्राच्या बर्थडे पार्टीसाठी आला होता आणि कोरेगाव पार्कमध्ये बर्थडे पार्टी करून दारूच्या नशेत त्याने कार चालवली आणि नाकाबंदीसाठी उभा असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला उडवलं. याच प्रकरणी अर्णवला आता अटक झाली असून तीन दिवसाची पोलीस कोठडी देखील त्याला सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीस उपायुक्त स्मर्तना पाटील काय म्हणाल्या

आरोपी पुण्यात फिरण्यासाठी आला होता. तो आणि त्याचे काही मित्र गाडीतून येत असताना पोलिसांनी त्यांची गाडी अडवली. त्यावेळी गाडी न थांबवता ट्रिपल बॅरिकेटला धडकून ते गेले आणि त्यावेळी तिथे उभे असणाऱ्या एका पोलीस महिला कर्मचारी यांना देखील त्यांनी धडक दिली. त्या गाडीसोबत पन्नास ते साठ मीटर फरपटत गेल्या. त्यामध्ये त्या गंभीर जखमी झाल्या. परंतु ते गाडी न थांबवता आरोपी तसाच पुढे निघून गेला होता. त्यानंतर गुन्हा दाखल करून तपास करण्यात आला. गाडीचा वेग भरधाव होता. पूर्ण रस्त्यावरच्या सीसीटीव्ही आम्ही चेक करत होतो. दुसऱ्या दिवशी रात्री ही गाडी आम्हाला सापडली.

कोरेगाव पार्कच्या हद्दीमध्ये खाजगी सीसीटीव्हीच्या मदतीने, सोसायटीच्या सीसीटीव्हीने, त्याचबरोबर हॉटेलच्या सीसीटीव्हीने, चेक करण्यात आला. त्यानंतर त्या गाडीचा नंबर समजला गाडीचा नंबर मिळाल्यानंतर त्यावरून गाडीचा मालक कोण आहे. याची माहिती काढण्यात आली. त्यावेळी समजलं ही कार झूम कार वरून भाड्याने घेण्यात आली होती. यादरम्यान ही कार कोणाला भाड्याने दिली होती त्याची माहिती काढण्यात आली. संबंधित आरोपी हा खडकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत सापडला. तो आणि त्याचा मित्र पुण्यात दिल्लीवरून आलेले होते. त्यांचे इतर दोन मित्र पुण्यात होते. असे चौघेजण त्यादिवशी रात्री कोरेगाव पार्कमध्ये गेले होते आणि परत येताना त्यांच्याकडून हा अपघात झाला आहे. पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# औषधांच्या साठ्याबाबत ससून अलर्ट मोडवर

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातल्या अंबाजोगाईमधील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात बनावट औषधे पुरवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघड झाला. बंदी घालण्यात आलेल्या विशाल एंटरप्रायजेसकडून ससून रुग्णालयालाही औषधांचा पुरवठा झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर ससून सर्वोपचार रुग्णालय प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या उपलब्ध असलेल्या सर्व औषधांची चाचणी एफडीएकडून करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ससून रुग्णालयाला औषधांचा पुरवठा करणार्या कंपन्या वेगळ्या असल्या तरी पुरवठादार तोच असल्याने ससून अलर्ट मोडवर आले आहे. संबंधित पुरवठादाराकडून आलेल्या औषधांच्या साठ्याची तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाची मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लपा जाधव यांनी दिली.

पुरवठादाराकडून आलेल्या साठ्यामध्ये ४०४० पेनकिलर इंजेक्शन (डायक्लॉफिनॅक), झटका येण्याच्या आजारावरील औषधाचे (मिडियाझोलम) १४४० गोळ्या, लहान मुलांना दिल्या जाणार्या कॅल्शियम सिरपच्या १२० बाटल्या, स्टेरॉईडच्या (डेक्सामिथॅसोन) ५००० गोळ्या आणि गर्भावस्थेमध्ये वापरल्या जाणार्या (मिसोप्रोस्टॉल) औषधाच्या ७५०० गोळ्या आदींचा समावेश आहे. विशाल एंटरप्रायजेसकडून कोणतीही औषध खरेदी न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

औषधांचा साठा, त्यांची तपासणी याबाबत मंगळवारी आयुक्तांसह व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक पार पडली. या वेळी स्थानिक स्तरावर खरेदी केली जाणारी औषधे, पुरवठादार, संबंधित कंपन्या यांची माहिती संकलित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानसुार ससून प्रशासनाने ताबडतोब माहिती संकलित करून कार्यवाहीला सुरुवात केल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.जिल्हा रुग्णालयाची संबंधित पुरवठादाराकडून औषध खरेदी नाही बनावट औषधांच्या धक्कादायक घटनेच्या पार्श्वभूमीवर औंध जिल्हा रुग्णालयातील औषधांचा साठा आणि पुरवठादार याबाबत कसून तपासणी करण्यात आली. विशाल एंटरप्रायजेसकडून जिल्हा रुग्णालयाने कोणतीही औषध खरेदी केली नसल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांनी सांगितले.

# सर्व निवडणुका ताकदीने लढविणार : युगेंद्र पवार



बारामती । प्रतिनिधी

बारामतीत नगरपरिषदेसह जिल्हा परिषद, पंचायत समिती व तिन्ही कारखान्यांच्या निवडणुका ताकदीने लढविणार असल्याची घोषणा विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांनी केली. बारामती तालुक्यात गावभेट आभार दौर्यात ते बोलत होते.

पवार म्हणाले, बारामती तालुक्यात विरोधकांच्या ताब्यात सगळ्या संस्था आहेत. आपल्या ताब्यात एकही संस्था नाही. त्यांच्या ताब्यातील संस्थांमध्येच पाच-सहा हजार कामगार असतील, तरीही आपण चांगली लढत देत ८० हजार मते मिळवली.

राज्यात विधानसभा निवडणुकीचा कौल आश्चर्यकारक आहे. अनेक दिग्गज नेते पराभूत होत असताना गोपीचंद पडळकर यांच्यासारखे निवडून आले. कोरोना काळात आई गेल्यानंतरही राजेश टोपे यांनी काम थांबविले नाही.

बाळासाहेब पाटील, अशोक पवार यांच्यासारखी कामाची माणसे पराभूत झाली. बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या अनुभवी नेत्याला पराभव पत्करावा लागला. मी तर नव्याने राजकारणात आलो आहे, तरीही मी चांगली टक्कर दिली. आपण जर काम करत राहिलो, चिकाटी सोडली नाही, तर पुढील विधानसभा आपली असेल, असे ते म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्था, सोमेश्वर, माळेगाव, छत्रपती कारखान्याच्या निवडणुका आपण लढविणार आहोत. त्यासाठी आत्तापासूनच कामाला लागा, असे आवाहन त्यांनी केले. साखर कारखान्यात गरीब, होतकरूंना संधी न देता संचालक मंडळाने घरातील, जवळचे लोक भरले आहेत, हे मुद्दे तुम्ही मांडा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

# वेंकीजचे संचालकांच्या बर्थडे पार्टीत स्पिकरचा दणदणाट; आयोजक कंपनीच्या सरव्यवस्थापकावर गुन्हा दाखल

पिंपरी चिंचवड: वेंकिज कंपनीचे संचालक बालाजी राव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित पार्टीत ध्वनी प्रदुषण कायद्याचे उल्लंघन केलं जात आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या बावधन पोलिस ठाण्यात आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्याच्या बावधन परिसरात असलेल्या कोकाटे वस्ती परिसरात प्रसिद्ध वेंकिज कंपनीचे संचालक बालाजी राव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पार्टीत मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदुषण झाल्या प्रकरणी आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बावधन पोलिस ठाण्याच्या हद्दीत ८ डिसेंबरच्या रात्री ११.३० ते मध्यरात्री २.३० च्या दरम्यान



ही पार्टी झाली होती, त्यात संचालक बालाजी राव स्वत: हा उपस्थित होते, त्यांनी केक देखील कापला होता. दरम्यान या ठिकाणी मोठमोठ्याने प्रसिद्ध गायकाचे लाईव्ह कार्यक्रम लाऊड स्पिकर आणि एलईडी लावल्याने या भागातील रहिवाशांनी ध्वनी प्रदुषणचा त्रास जाणवू लागला. या कार्यक्रमाच्या आयोजकांवर गुन्हा दाखल करावा यासाठी परिसरातील १०० पेक्षा अधिक जेष्ठ नागरिक बावधन पोलिसांत गेले होते. आता या प्रकरणी बावधन पोलिसांनी आयोजक आदिनाथ संभाजी मते यांच्या वर भा.न्या. सं . २९२, २९३ आणि ध्वनी प्रदुषण ३,४ तसेच पर्यावरण संरक्षण कायद्या अंतर्गत ३३ आर १३१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकं काय म्हणाले पोलिस?

पोलिसांनी याबाबत माहिती देताना सांगितलं की, बावधान पोलिस ठाण्याच्या अंतर्गत ८ डिसेंबरच्या रात्री एका वाढदिवसाच्या पार्टीचे आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये वाढदिवसाच्या पार्टी दरम्यान दोन्ही प्रदूषण आणि वेळेचं मर्यादा पलीकडे स्पीकर आणि डीजेचा वापर करून सार्वजनिक उपद्रव केला. याबाबत एफ आय आर दाखल करण्यात आले आहे. कोकाटे वस्ती बावधन या ठिकाणी या पार्टीचा आयोजन करण्यात आलं होतं. बावधनच्या काही नागरिकांनी याबाबतची तक्रार दिली होती. सोसायटी पासून जवळ असलेल्या कोकाटे वस्ती या ठिकाणी खाजगी जागेवर या वाढदिवसाच्या पार्टीचे नियोजन करण्यात आले होते. स्पीकर आणि डीजेचा उपद्रव सहन करावा लागला. त्या अनुषंगाने कायदेशीर कारवाई करावी असं तक्रारदारांचं म्हणणं आहे. त्यांनी याबाबत निवेदन दिले आहे त्यांनी निवेदनावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# सायरन सुरु ठेवल्याने रुग्णवाहिकचालकाला मारहाण

नारायणगाव । प्रतिनिधी

रुग्णवाहिकेचा सायरन का वाजवतो, या कारणावरून झालेल्या बाचाबाचीतून रुग्णवाहिका चालकाला बेदम मारहाण केली. याप्रकरणी नारायणगाव पोलिसांनी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना येथील पुणे-नाशिक महामार्गावर घडली.


याप्रकरणी धनेश तळपे व एक अज्ञात तरुण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार झाले असून त्यांना अद्याप अटक करण्यात आली नाही, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

रुग्णवाहिका चालक सोमनाथ भास्कर गायधने (वय ३२, रा. कडाचीवाडी चाकण, ता. खेड) हे ७ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास येथील पुणे-नाशिक महामार्गावरून रुग्णवाहिका घेऊन जात असताना रुग्णवाहिकेचा सायरन सुरू होता. यामुळे धनेश तळपे व त्याचा एक अन्य साथीदार यांनी पाठलाग करून सोमनाथ गायधने यांची रुग्णवाहिका मोटर सायकल आडवी लावून येथील माऊली मिसळ हाऊस याहॉटेल जवळ थांबवली. त्यानंतर झालेल्या बाचाबाचीतून तळपे व त्याच्या अज्ञात साथीदाराने चालक सोमनाथ गायधने याला रुग्णवाहिकेतून खाली ओढले. 'रुग्णवाहिकेचा सायरन का सुरू ठेवला' या कारणावरून गायधने यांना बेदम मारहाण केली. त्यानंतर आरोपी पसार झाले. गायधने यांच्या फिर्यादीवरून नारायणगाव पोलिसांनी तळपे व त्याचा एक अज्ञात साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल केला.

# ९ महिन्यात १८ हजार पुणेकरांना चावले भटके कुत्रे; महापालिका म्हणतेय नोंदणी ऑनलाईन

पुणे । प्रतिनिधी

भटक्या कुत्र्यांची भटकंती सर्वसामान्या नागरिकांना व पुणेकरांना त्रासदायक होत असल्याचं दिसून येत आहे. कारण, पुणे (झींपिश) शहरात गेल्या ९ महिन्यांमध्ये १८ हजारांहून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी (ऊेस) चावा घेतला आहे. गेल्या वर्षी २०२३ मध्ये जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत १४ हजार ७३ घटना घडल्या होत्या. त्यावरून शहरात कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, महापालिकेने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.



पुण्यात गेल्या ९ महिन्यात १८ हजार जणांना कुत्र्यांनी चावा घेतला असून दर महिन्यात दोन हजार नागरिकांना चावा घेतल्याचं हे प्रमाण आकडेवारीतून समोर आलं आहे. त्यामुळे, पुण्यातून पादचारी मार्गाने किंवा गल्ली परिसरातून जाताना नागरिकांनी, पादचाऱ्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचं असल्याचं लक्षात येईल. विशेष म्हणजे पुणे महापालिका या घटनांची गंभीर दखल कधी घेणार ? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तर, पुणे शहरात गेल्या ९ महिन्यांमध्ये १८ हजाराहून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. ही संख्या इतकी मोठी असली तरी सुद्धा दुसऱ्या बाजूला कुत्र्यांचे लसीकरण आणि नसबंदी करण्यात येत असल्याचा दावा पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे.

दरमहा ४ हजार कुत्र्यांची लसीकरण

यंदाच्या जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत १८ हजार ९६० नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. या आकडेवारीनुसार शहरात दर महिन्याला कुत्रे चावीच्या दोन हजार घटना घडत असल्याचे दिसून आलं. गेल्या वर्षी २०२३ मध्ये जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत १४ हजार ७३ घटना घडल्या होत्या. भटके कुत्रे चावल्याची तक्रार आल्यानंतर संबंधित कुत्र्याला रेबीज आहे का याची तपासणी केली जीते. रेबीज नसल्याची खात्री झाल्यानंतरच त्याला पुन्हा मूळ वसतिस्थानात सोडले जाते. दर महिन्याला सरासरी साडेचार ते पाच हजार कुत्र्यांचे लसीकरण आणि नसबंदी शस्त्रक्रिया केली जाते.

महापालिकेची प्रतिक्रिया

कुत्रा चावल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाय न केल्यास रेबीज होण्याची शक्यता असते. शहरातील कुत्र्यांचे लसीकरण आणि नसबंदी शस्त्रक्रिया केली जाते. महापालिका आरोग्य विभागाकडे शहरातील श्वानांची ऑनलाइन पद्धतीने नोंदणी केली जाते, अशी माहिती पुणे महापालिकेचे आरोग्य प्रमुख डॉ.निना बोराडे यांनी दिली. पण दुसऱ्या बाजूला या घटनांना पुणेकर वैतागले आहेत. त्यांनी पालिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केलीय.

# कुदळवाडीत आगीचा भस्मासुर ; पन्नासहून अधिक गोदामे, दुकाने जळून खाक

चिखली । प्रतिनिधी

कुदळवाडी येथील एका गोदामाला आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररुप धारण केले. या आगीत ऑईलचा भडका आणि गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने आगीत आसपासची तब्बल पन्नासहून अधिक गोदामे आणि दुकाने भस्मसात झाली. सोमवारी (दि. ९) सकाळी साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. पोलिस प्रशासनाने आग लागलेल्या परिसरातील नागरिकांना वेळीच बाहेर काढल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.

शहरातील चिखली परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत भंगाराची गोदामे उभारण्यात आली आहेत. या



ठिकाणी दाटीवाटीने दुकाने असल्याने येण्याजाण्यासाठी अरुंद रस्ते आहेत. सोमवारी सकाळी एका दुकानामध्ये छोटी आग लागली. त्याठिकाणी ऑइलचे डब्बे असल्याने आग वाढली. काही क्षणात आजूबाजूच्या दुकानांमध्ये ही आग पसरली. त्याठिकाणी गॅस सिलिंडर असल्याने त्याचे स्फोट होऊन आगीने रौद्ररुप धारण केले. धुराचे मोठे लोट आकाशात दिसू लागले. आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिकांना अग्निशमन दलाला माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान आणि बंब लागलीच घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांचाही मोठा फौजफाटा परिसरामध्ये दाखल झाला. गोदाममध्ये रबर, प्लास्टिक, काच, कापड असे साहित्य असल्याने आगीने रौद्ररुप धारण केले. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका अग्निशमन विभागाचे १३ बंब, पीएमआरडीए, एमआयडीसी चाकण, टेल्को आमि पुणे महापालिकेचे सहा बंब असे १९ अग्निशमन बंब कार्यरत होते. दुकानांमध्ये ऑईल, रंग तसेच इंधनाचे डब्बे असल्याने आग झपाट्याने वाढली. गोदामालगत असलेल्या चाळींमधील नागरिकांना इतरत्र हलवण्यात आले. नागरिक घरातील गॅस सिलिंडर घेऊन बाहेर पडले. तसेच गोदामालगत असलेल्या सोसायटीमधील नागरिकांनाही इतरत्र हलवण्यात आले. सोसायटीमधील नागरिकांनी गॅस सिलिंडर बाहेर काढून ठेवत आपले राहते घर सोडले. तपास चिखली पोलिस करत आहेत.

# बारामती कॉलेज ऑफ फार्मसीच्या दोन प्राध्यापिकांना पीएच. डी

बारामती । प्रतिनिधी

बऱ्हाणपूर (ता. बारामती) येथील बारामती कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापक डॉ. स्वाती दत्तात्रेय बुरंगले व डॉ. गौरी बाळासाहेब पाटील यांना भोपाळ, मध्यप्रदेश येथील मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटीने औषधनिर्माणशास्त्रातील पीएच. डी पदवी नुकतीच प्रदान केली आहे.





येथील प्राध्यापक डॉ. स्वाती बुरंगले यांनी 'क्वालिटेटिव्ह आणि क्वांटिटेटिव्ह विश्लेषण ऑफ फायटो बायोॲक्टिव्ह घटक फ्रॉम रूट्स ऑफ प्लांट अरवा लॅनाटा लीन' या विषयावर सखोल संशोधन केले. त्यांचे मार्गदर्शक प्रा. डॉ. कपिल मालवीया आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी त्यांच्या संशोधनाला योग्य दिशा दिली.

या संशोधनात अरवा लॅनाटा लीन या औषधी वनस्पतीच्या मुळांमधील फायटो बायोॲक्टिव्ह घटकांचे गुणधर्म, रसायन संरचना आणि त्यांची औषधी उपयोगिता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. त्यांनी तयार केलेला शोधनिबंध नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित केला आहे. या संशोधनातून नवनवीन औषधनिर्मितीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

तसेच डॉ. गौरी पाटील यांनी 'डेव्हलपमेंट आणि कॅरेक्टरायझेशन ऑफ एनॅनोसॉम्स फॉर ट्रीटमेंट ऑफ फंगल इन्फेक्शन' या विषयावर संशोधन केले. त्यांचे मार्गदर्शक प्रा. डॉ. विशाल गुप्ता आणि डॉ. ज्ञानेश्वर तौर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी फंगल संसर्गावर परिणामकारक औषध तयार करण्यासाठी नॅनोसॉम्स विकसित केली.

त्यांनी केलेल्या संशोधनामुळे फंगल संसर्गाच्या उपचारांसाठी अधिक प्रभावी औषधनिर्मितीच्या दिशा उलगडल्या आहेत. त्यांच्या शोधनिबंधाला देखील आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये मान्यता मिळाली आहे. या दोन्ही प्राध्यापकांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणात संशोधनाची प्रेरणा निर्माण होईल, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील यांनी यावेळी सांगितले.